
# श्री साईलीला




वादळी वारा व पाऊस थांबविण्याचा चमत्कार

जून

६० पैसे

१९७४

# अनुक्रमणिका-जून १९७४


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | श्रीसाईबाबा आणि शिवछत्रपती<br>पुण्यस्मरण–कै. प्रा. अण्णासाहेब परचुरे |
| २) | श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने ३ | सदानंद चेंदवणकर |
| ३) | प्रार्थना | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ४) | बालमुकुंद | प्रा. डॉ. श्रीराम पंडित |
| ५) | अनंतता | श्री. चिपळुणकर गुरुजी |
| ६) | श्रीसाईनाथ स्तोत्र | प्रा. डॉ. सौ. चारुशीला गुप्ते |
| ७) | प्रताप दोहींचा समसमान | गुरुवर्य श्री. द. शं. टिपणीस |
| ८) | श्रीसाईनाथ महाराज ललित चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ९) | जगी सर्व सुखी– | श्री. हे. घ. कुळकर्णी |
| १०) | श्रीगोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन | श्री. पु. मु. अत्रे |
| ११) | अनंतात अंत | श्री विजय हजारे |
| १२) | मार्ग कोणता | लक्ष्मीतनया |
| १३) | तू माता हम बालक तेरे | राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' |
| १४) | शिरडीचे श्रीसाईबाबा | श्री. रमाकांत पंडित |
| १५) | शिरडी वृत्त | |

# श्री सा ई वा क्सु धा

जगा लावावें सत्पथीं । हेंचि साईलीलेची कृती ॥



बाबाच सर्वांचें अधिष्ठान । तयांसी केउतें आसन ।
त्याहीवरी रौप्य सिंहासन । भक्तभावन परी बाबा ।।४१।।
बहुतां दिसांची जुनी बैठक । गोणत्याचा तुकडा एक ।
त्यावरी घालिती भक्त भाविक । गादी सुरेख बैसाया ।।४२।।
मागील टेकायाची भिंत । तेथें तक्या ठेविती भक्त ।
जैसें भक्तांचें मनोगत । बाबाही वागत तैसेंच ।।४३।।
वास्तव्य दिसें शिरडींत । तरी ते होते सर्वगत ।
हा अनुभव निज भक्तां प्रत । साई नित्य दाखवीत ।।४४।।
स्वयें जरी निर्विकार । अंगिकारीत पूजा-उपचार ।
भक्तभावार्थानुसार । प्रकार सर्व स्वीकारीत ।।४५।।

साईसत्‌चरित्र-अध्याय ११ वा

---


## श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचें अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] जून १९७४ [ अंक ३

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

● डॉ. श्री. दि. परचुरे, एम. ए. पी, एचडी., रा. भा. प्रवीण

● श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्‌सी, एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक रु. ०-६० फक्त.

*

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

पीन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय

# श्री साईबाबा आणि शिवछत्रपती

श्रीछत्रपती शिवाजी महाराजांची ३४५ वी जयंती व त्यांच्या राज्यारोहणाचा त्रिशताब्दी महोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. इतर अन्य जयंत्याप्रमाणे ही केवळ नैमितिक बाब नसून महाराष्ट्राच्या प्रगतीची ती एक प्रेरणा मानली जाते. अशा प्रसंगी व निमित्याने भाषणे करणारी पुढारी मंडळी शिवरायाची व महाराष्ट्राच्या थोर परंपरेची बारेमाप स्तुती करताना आढळतात. महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात जर्मनी किंवा जपान करू. मराठी संत महात्म्यांच्या संदेशाला आम्ही विसरणार नाही. मराठी संस्कृती व महाराष्ट्र धर्म याचा आम्ही सोज्वळ दृष्टिकोनातून विचार प्रचार व आचार करू वगैरे बोलत असता प्रत्यक्ष कृतीत आम्ही काय आचरतो ह्या गोष्टीची छाननी केली तर विपरीत निष्कर्ष निघतात.

समाज धुरीणानी समाजाच्या दुर्बलतेचे कारण म्हणून सामाजिक विषमतेवरच बोट ठेवले व तिच्या निर्मूलनासाठी आपापल्या परीने प्रयासही केले. उच्चनीचतेच्या दंभावर, ढोंगावर ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आणि आमचे श्रीसाईनाथ आदि संतांनी प्रहार केलेले आहेत. त्यापुढील अर्वाचीन काळात महात्मा ज्योतिबा फुले, आगरकर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपापल्या मार्गांनी प्रयत्न केले.


माणसाची माणूस म्हणून असलेली प्रतिष्ठा ही सर्वत्र व सर्वकाळी समानच असली पाहिजे त्यात विषमतेला वाव नाही. माणसाच्या अंगभूत कर्तृत्वास संधी समानच असली पाहिजे असे सामाजिक समतेचे तत्वज्ञान गेल्या शतकात प्रकर्षाने प्रगट झाले. यातच समाजाचे सामर्थ्य आहे याचीही जाणीव झाली. त्या काळात येथे इंग्रजांची राजवट होती. या सामाजिक उद्बोधनाच्या कामी परकीय सत्ता आड येते हे ध्यानी आल्यामुळे अनेक समाज क्रांतीकारकांची बरीच ताकद स्वातंत्र्यप्राप्तीच्या राजकीय लढ्यातही खर्ची पडली. स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक एकतेच्या प्रयत्नानां अधिक गती मिळेल अशी स्वाभाविक अपेक्षा होती पण ती पूर्ण होऊ शकलेली नाही. आजही सामाजिक विषमता आणि आर्थिक दुरवस्था या एखादया विष वर्तुळाप्रमाणे एकमेकींचा पाठपुरावा करीत आहेत.

माणसा-माणसांत भेद करून व उच्च-नीचतेचे खोटे अहंकार जोपासून विषमतेचे विष पसरविणाऱ्या जातीसंस्थांचे आणि चातुर्वर्णाचे उच्चाटन केले पाहिजे. हे भेद मोडीत काढून समाजरचनेत आमूलाग्र परिवर्तन घडवून जिथे जन्मावर आधारित भेदभाव उच्च-नीचता नाही, आपापल्या गुणांचा विकास करून घेण्याची सर्वांना मुक्त संधी आहे अशी समतायुक्त एकात्म समाजरचना आपल्याला निर्माण करावयाची आहे. हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून त्या दिशेने वाटचाल झाली पाहिजे. परंतु त्या दिशेने

जाणीवपूर्वक विशेष पावले पडत असल्याचे दिसत नाही. ही स्थिती केवळ ग्रामीण भागातच आहे असे नव्हे तर मोठमोठ्या शहरातूनही या भेदबुद्धीचा आविष्कार वेगवेगळ्या प्रकारे होताना आढळतो. समाज मनात खोलवर भिनलेला हा रोग मूळापासून नाहिसा व्हावा आणि तो पुन्हा उद्‌भवण्यास अवसर मिळू नये यासाठी सतत विषमता विरोधाचे समतेचे संस्कार करीत राहण्याची आवश्यकता आहे. संघटना आणि समाजसेवक यांनी तर या दिशेने सतत प्रयत्नशील असले पाहिजे. या प्रयत्नाना अधिक गती यावी यासाठी सर्व मतभेद बाजूला सारून समाजाच्या उन्नतीची आकांक्षा बाळगणाऱ्या सर्व व्यक्ति आणि शक्तींनी या कामात रस घेऊन सहभागी होण्याची आणि हे कार्य नेटाने चालविण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

उपकार करण्याच्या भावनेने नव्हे तर सामाजिक कर्तव्याच्या जाणीवतेने समाजातील बलिष्ठ जातींनी सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या मोहिमेत उतरले पाहिजे. त्यांच्या बरोबर लाचारीच्या भूमिकेतून नव्हे तर आपल्या स्थानाची व हक्काची जाणीव झालेला जागृत समाज घटक या नात्याने अन्याय-पीडित दलितांनीही आग्रहपूर्वक सामाजिक समतेची प्रक्रिया पुढे नेली पाहिजे. सामाजिक दृष्टीने महाराष्ट्र एकजिनसी असे राज्य निर्माण झाल्याशिवाय आर्थिक व राजकीय प्रगतीची भाषा फोल आहे अशा स्थितीत विकास झाला तरी तो मूठभर लोकांचाच होईल व दलितांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाईल. ह्या आपत्तीतून वर येण्यासाठी श्री साईबाबांनी खूप खूप प्रयत्न केले, या आपत्तीतून वर येण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी पण प्रयत्न केले. तेव्हा या आपत्तीतून वर येण्यासाठी मराठी संतांची शिकवण ही अद्यापही प्रेरक अशीच आहे.

## पुण्यस्मरण



प्रा. द. दि. परचुरे

दिनांक १ जून १९७३ ! साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक प्रा. द. दि. परचुरे हे मासिकाच्या जून १९७३ च्या अंकाचे काम करीत असताच निर्घृण काळाने त्यांच्यावर अचानक झडप घातली तो दुःखद दिवस ! प्रा. परचुरे ह्यांच्या निधनाचे दुःख आवरून मासिकाच्या संपादनाच्या कार्यासाठी कर्तव्यबुद्धीने आम्ही आमची कंबर कसली व गेले वर्षभर मासिकाच्या संपादनाचे काम यथामति पार पाडले; परंतु वेळोवेळी प्रा. परचुरे ह्यांच्या संपादन कौशल्याची उणीव आम्हांला जाणवल्याशिवाय राहिली नाही. प्रा. परचुरे ह्यांनी जे नवे स्वरूप मासिकांना प्राप्त करून दिले त्याच स्वरूपात श्रीसाईबाबांच्या कृपेने गेले एक वर्ष मासिके प्रसिद्ध होत आहेत. प्रा. परचुरे ह्यांना त्यांच्या प्रथम श्राद्धदिनी आम्ही श्रद्धांजली वाहत आहोत.

# श्रद्धांजली

ले. बाळकृष्ण दिनकर परचुरे

(साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक, प्रा. द. दि. परचुरे यांच्या अकाली निधनास दिनांक १–६–७४ ला एक वर्ष होत आहे. त्यांचे धाकटे बंधु श्री. बाळकृष्ण दिनकर परचुरे ह्यांनी प्रा. परचुरे ह्यांना प्रथम श्राद्धदिनी वाहिलेली ही श्रद्धांजली. प्रा. परचुरे कीर्तनास उभे रहात त्यावेळी श्री. बा. दि. परचुरे हे त्यांचे मागे राहून साथ करीत व संगीताची बाजू चांगल्या प्रकारे संभाळीत असत.

—संपादक).

दिनांक १ जून १९७३ चा दिवस. त्या दिवशी नेहमीप्रमाणे मी कचेरीत गेलो होतो. दुपारी २ वाजण्याचे सुमारास मला कोणीतरी सांगितले की, तुमचा फोन आहे. माझ्या मुलाने मला सांगितले की "अण्णा सिरीयस आहेत लवकर घरी या" घरी आल्यानंतर "अण्णा सकाळीच वैकुंठासी गेले" हे ऐकून मनाला भयंकर धक्का बसला. या गोष्टीवर विश्वास बसायला मन कबूल होईना. लहानपणी आपल्यावर आईवडिलांचे छत्र असते. त्यांच्या पश्चात् वडील बंधूंचे छत्र असते. आज ते नाहीसे झाले व मी अनाथ, पोरका झालो असे मनाला वाटले.

लहानपणापासून आम्हां सर्व भावंडांवर त्यांचे अतिशय प्रेम असे व सबंध आयुष्यात कोणालाही एकादे वेळी तरी ते टाकून बोलण्याचे मला आठवत नाही. ते कॉलेजांत प्राध्यापक होते. तरी गेली १५ वर्षे त्यांचा अध्यात्माचाच जास्त अभ्यास चालू होता. "बहुत सुकृताची जोडी। म्हणूनि विठ्ठलीं आवडी" या ओळीतील वर्णनाप्रमाणे ते पेशाने प्रा. असले तरी गेली १०–१२ वर्षे फेटा बांधून, कोणाचीही भीड न ठेवता, कीर्तनाला उभे रहात. प्रवचनापेक्षा ते कीर्तनात अतिशय तल्लीन होत असत. कीर्तनात त्यांना जे सत्य सांगायचे असे, ते निरनिराळे दृष्टांत देऊन अथवा काही गोष्टी सांगून श्रोत्यांच्या मनावर चांगले बिंबवीत असत. तसेच कीर्तन हे वर्षानुवर्षे चालत आलेल्या रूढीप्रमाणे वाटू नये यासाठी त्याविषयासाठी त्यांतील कवने ते स्वतः रचीत असत आणि ती सर्व कवने रसाळ, बोधप्रद, प्रासादिक व प्रसंगास अगदी योग्य अशीच असत.

एकदा कोणतेही कार्य हातात घेतले म्हणजे ते पूर्ण केल्याशिवाय त्यांच्या मनाला समाधान लाभत नसे. अण्णांना आम्ही आमच्या भागात ज्ञानेश्वरीवर प्रवचने करण्यास विनंति केली. त्या विनंतीला मान देऊन अण्णा ठरलेल्या दिवशी नियमितपणे हजर रहायचे. त्यांनी प्रचंड श्रोतृसमुदायाची कधीच अपेक्षा केली नाही व अगदी थोडे श्रोते नियमित आले तरी अण्णांनी आपले कार्य कधीही थांबविले नाही.


आपल्या पुस्तकांमध्ये अनेक अश्लील व भाकडकथा सांगितल्या आहेत. त्यांबद्दल बोलतांना ते नेहमी म्हणत की या कथा विपर्यास करून सांगितल्या आहेत; त्यामुळे आपल्या धर्माचे हे ग्रंथ चांगले असूनसुद्धा त्या गोष्टींवरून टीका करायला आपल्या धर्माचे महत्त्व कमी करावयास टीकाकारांची लेखणी सदैव सरसावत असते. म्हणून महाभारत त्यांनी आधुनिक पद्धतीने लिहावयास सुरुवात केली होती. दुर्दैवाने ते पूर्ण होऊ शकले नाही. नाहीतर तो एक उत्कृष्ट ग्रंथ झाला असता. मात्र कीर्तनकारांना उपयोगी पडतील अशा गोष्टींची दोन पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत. इतक्या प्रयासाने गोष्टी एकत्र करून त्यांनी छापलेली ही पुस्तके मराठी वाङ्मयाची ही भूषणेच ठरतील अशी मला खात्री वाटते.

अण्णा आमच्यातून देहरूपाने गेले असले तरी त्यांनी आपल्या प्रेमाने आपली आठवण आम्हा भक्तांजवळ सदैव ठेवली आहे म्हणून परमेश्वराजवळ माझी प्रार्थना आहे की पुढील जन्मीं जर मनुष्य जन्म दिलास तर अण्णासारखे बंधु मला दे! एवढी प्रार्थना करून त्यांच्या प्रथम श्राद्धदिनी (१–६–७४)ही श्रद्धांजली कै. अण्णांचे चरणीं अर्पण करतो.

# साई भक्तांची श्रद्धास्थाने.....३


# श्री. लिमयेबाबांचे श्रीसाई मंदिर

लेखक: श्री. सदानंद चेंदवणकर



मुंबापुरीत माहिम या नावाचा एक विभाग आहे. या विभागात श्रीशितळादेवीचे एक प्रसिद्ध व जुने असे मंदिर आहे. या मंदिरासमोरून निघून रेल्वे रस्त्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर रंगोद्यान अमर डाय कंपनी आहे व त्या कंपनीच्या समोरच यशोधन को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी आहे. या गृहसंस्थेच्या तिसऱ्या मजल्यावर श्री. लिमये नावाचे एक साईभक्त रहातात. "बाबा लिमये" म्हणून ते ओळखले जातात. बाबांनी आपल्या निवासस्थानी श्रीसाईबाबांचा मार्बलचा एक सुंदरसा पुतळा बसविला असून त्याच्या दर्शनासाठी रोजच्यारोज भाविकांची गर्दी होत असते.

साईभक्त श्री. बाबा लिमये हे मूळ पेणचे. त्यांचा जन्म १७ नोव्हेंबर १९२२ चा.त्यांचे संपूर्ण नाव श्री. माधव रंगनाथ लिमये. त्यांचे वडील हे पेणचे एक सुखवस्तू. ते रामदासी पंथी होते. ते अंगात कफनी परिधान करीत. त्यांना वैद्यकीचा नाद होता. जंगलातून ते स्वत: मूळ्या, झाडपाला आणीत व गरजूंना औषध म्हणून ते विनामूल्य देत. ते १९४५ साली निधन पावले. श्री. माधवरावांच्या मातोश्रींचे नाव गोपिकाबाई. एकंदर तीन पुत्र व दोन कन्या अशी अपत्यसंपदा त्यांना लाभली. त्यापैकी माधवराव हे तिसऱ्या



क्रमांकाचे. गोप्पिकाबाई १९५३ साली निधन पावल्या.

माधवरावांचे प्राथमिक ते मॅट्रिक-पर्यंतचे सारे शिक्षण पेणलाच झाले. १९४१ साली ते पेणच्या प्रायव्हेट हायस्कूलमधून मॅट्रिक उत्तीर्ण झाले, व जून १९४१ मध्ये मुंबईत रिझर्व्ह बँकेत नोकरीस लागले. तेव्हापासून तो आजतागायत गेली ३३ वर्षे ते त्याच बँकेत नोकरीस आहेत. रिझर्व्ह बँकेच्या ज्या विभागात नोटांची आवक-जावक सारखी चालू असते त्या "इश्यू डिपार्टमेंट" मध्ये बाबा अधिकारी आहेत. लिमये बाबांना श्री. वामदेव आपटे नावाच्या एका मित्राच्या नादाने ज्योतिष विषयक ग्रंथ वाचण्याचा नाद लागला इतका की या शास्त्रातील मोठमोठ्या रथी-महारथींची सारी पुस्तके त्यांनी आधाशासारखी वाचून काढली. काही संग्रही पण ठेवली. अधून मधून ते कुंडली पाहू लागले आणि गरजूंच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरें पण देऊ लागले.

आश्चर्य वाटेल की आजचे साईभक्त बाबा लिमये हे पूर्वी साईभक्त अजिबात नव्हते. ते देवळात-मंदिरात मुळीच जात नसत. त्यावेळी ते एक कुशल मराठी नाट्य दिग्दर्शक व नट म्हणून वावरत होते. उंबरठ्यावरी माप ठेविले, यंदा कर्तव्य आहे, स्वामी तिन्ही जगाचा, निर्माल्य वाहिले चरणी, वीषकन्या, लक्ष्मणरेषा, आंधळ्यांची शाळा इ. नाटकांचे दिग्दर्शन त्यांनीच केले होते. १९४९ ते ६२ पर्यंतचा त्यांचा हा काळ नाट्य दिग्दर्शनात गेला. नाटकाचे भारी वेड त्यांना त्या काळात लागलेले होते. नाट्यसेवे-बरोबरच त्यांनी १९४६ साली खालसा कॉलेजात सकाळच्या सत्रात नाव घालून १९४९ साली मराठी, इतिहास हे विषय घेऊन ते बी. ए. व १९५१ साली मराठी घेऊन एम. ए. झाले.

बाबासाहेब साईभक्त कसे काय झाले याची कथा मोठी चमत्कारिक आहे. बँकेत एकदा त्यांचे एक स्नेही श्री रामकृष्णन यांना साईबाबांची एक मूर्ती भेटीदाखल आली पण नेमके त्यादिवशी रामकृष्णन गैरहजर होते म्हणून ती मूर्ती लिमये साहेबांनी आपल्या कडे ठेवून घेतली. ती त्यांनी दुसऱ्या दिवशी आणली. पण त्यादिवशीही ते गैरहजर. पुन्हा ज्या ज्या दिवशी लिमये मूर्ती कचेरीत घेऊन जात त्या त्या दिवशी आपला रामकृष्णन अनुपस्थित. शेवटी लिमयेबाबांनी सांगितले आज ही मूर्ती नेतो आहे खरे पण जर का रामकृष्णन आला नाही तर ही मूर्ती मजजवळच कायम राहिल. लिमयांनी मूर्ती पुन्हा कचेरीत नेली आणि नेमका रामकृष्णन आला नाही आणि मग अर्थात्च ती साईनाथांची मूर्ती लिमये यांचे जवळ राहिली ती कायमचीच. या मूर्तीची ते आपल्या आपणच पूजा-

अर्चा करू लागले, व तेव्हापासून ते साईभक्त झाले आणि आता तर आजन्मच. १९६३ साली श्री. दादासाहेब भागवत हे सद्गृहस्थ लिमये बाबांच्या जीवनात आले व त्यांनी त्या वर्षाच्या अखेरीस त्यांना श्रीपंत महाराजांच्या बाळेकुंद्रीस अध्यात्माची दीक्षा दिली. २६ जाने. १९६६ रोजी त्यांनी आपल्या घरी श्रीसाईबाबांची एक जंगी तसबिर आणली २८ जानेवारीस तिची विधीपूर्वक त्यांनी प्रतिष्ठापना केली तिची रोजच्यारोज पूजा-अर्चा ते मनोभावे करतात, आणि आता १ एप्रिल १९७४ रोजी रामनवमीच्या शुभ-मुहूर्तावर त्यांनी श्रीसाईनाथाची एक जयपूर जवळील मकराणा स्टोनची घडविलेली मूर्ती आणून ती आपल्या निवास स्थानाच्या दालनात विख्यात साईभक्त आणि योगी सिद्ध पुरुष डॉ. श्री. खक्कर बाबा यांच्या शुभ हस्ते प्रतिष्ठापित केली आहे. ही मूर्ती मोठी गोड असून ती गिरगावच्या तालीम स्टुडिओचे सध्याचे चालक श्री. हरीश तालीम यांनी तयार केली आहे. या मूर्तीची किंमत १५००० रु. आहे. या मूर्तीच्या शेजारीच श्री. खक्कर बाबांनी आपल्या दैविक सिद्धी शक्तीने काढलेल्या पादुका व त्यावर चढ-विलेले अलंकार एका सुबक बंद पेटीत घालून ठेवलेले आहेत. मूर्तीसमोर व तसबिरी-समोर अखंड समया तेवत असतात. आतापर्यंत पंधरा हजारावर भक्त या मूर्तीचे दर्शन घेऊन गेले आहेत. त्यांच्या साई दरबारात एका वेळी शंभरावर भाविक बसू शकतात. आपला दरबार जास्तीत जास्त सुशोभित करण्याचे त्यांचे यत्न चालू आहेत. येथल्या मूर्ती व तसबिरी पुढे जमलेले पैसे दरवर्षी गरीब, गरजू व शिक्षणेच्छू विद्यार्थ्यांना मुक्त-हस्ते दिले जातात.

श्रीलिमये बाबांचा विवाह १९५१ साली झाला. त्यांच्या पत्नी पूर्वाश्रमीच्या कु. प्रमिला यशवंत पराडकर. त्या जळगावच्या त्या एम. ए. बी. एड. असून दादरच्या रिव्होली सिनेमाशेजारच्या छबिलदास शाळेत शिक्षिका आहेत. १९६४ च्या नोव्हेंबरात बाबांना एका पुत्ररत्नाचा लाभ झाला. त्याचे नाव त्यांनी गुरुदास असे ठेवले आहे.

श्री लिमये बाबांना आता एकच ध्यास लागला आहे व तो म्हणजे श्रीसाई सेवेचा. श्री बाबांच्या दृष्टांताच्या अनेक कथा त्यांच्यापाशी आहेत. शिरडीला ते अनेकदा जाऊन आले आहेत. नोकरी आणि आपले रहाते घर. मंदिर याशिवाय त्यांचे अन्यत्र जाणे कमीच. नोकरीवरून सुटले की ते तडक आपल्या गृहमंदिरात येतात व श्रीसाई सेवेत दंग होतात. गुरुवारी सायंकाळी व रविवारी सकाळी ते अडीअडचणीत सापडलेल्या भाविकांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे पण सांगतात. आज समाजातील काही लोक आपल्या घराची म्युनिसिपालटी करून टाकतात, जीवनाची म्युनिसिपालटी करतात पण लिमये बाबांनी आपल्या घराचे मंदिर बनविले व तेही श्रीसाई मंदिर ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे.

# प्रार्थना

डॉ. के. भ. गव्हाणकर, कुर्ला–७०

जगातील कोणताहि धर्म घेतला तरी त्यामध्ये प्रार्थनेस फार महत्त्वाचे स्थान आहे असे आढळून येते. "निर्वाणीचा सखा पांडुरंग" केवळ जिव्हाळ्याच्या, कळवळ्याच्या हाकेने धाव घेतो. प्रार्थना म्हणजे धर्माचे जीवन होय. "विचार हा तत्व-ज्ञानाचा आत्मा त्याप्रमाणे प्रार्थना हा धर्माचा आत्मा होय." धर्मामध्ये ईश्वराविषयीं-च्या आस्तिक्य भावास जेवढे महत्त्व तेवढेच महत्त्व प्रार्थनेस आहे; किंबहुना आस्तिक्य भाव ,विश्वास, आणि प्रार्थना ही निराळी काढता यावयाची नाहीत.

ज्याच्यावर आपला अनन्यभावे करून विश्वास आहे त्याची प्रार्थना आपण वेळो-वेळी करतो. प्राण्याच्या जीवनात कालगतीने जेव्हा आपत्काल व भयावह परिस्थिति निर्माण होते तेव्हा सुरक्षितासाठी व सुखासाठी तो प्राणी आपल्या सामर्थ्यवंत प्रियजना-कडे धाव घेतो. आपत्काली मोठ्या प्रेमाने जो आश्रय देऊ शकेल त्यालाच स्वसंरक्षणार्थ सर्व प्राणी काकुळतीने पाचारितात, हे नैसर्गिकच आहे.

धर्म, देवावरील विश्वास व प्रार्थना या तिन्ही गोष्टी एक जीवनच आहेत. सर्व धर्मातील प्रार्थनांचा भाग जर काढून टाकला तर मानवजातीचा व परमेश्वराचा संबंध तोडल्याप्रमाणे होईल. आपल्या जिवलग पित्यासमोर उभा असलेल्या लेकराचा जिव्हा निःशब्द केल्याप्रमाणेच होईल.

प्रार्थनेत धर्माची प्रत्यक्षता व जीवंतपणा असतो, धर्माचे ऐश्वर्य व थोरवी त्या त्या धर्मोपासकाच्या तोंडी ज्या प्रार्थना असतात त्यातूनच व्यक्त होते.

प्रार्थना म्हणजे जीवाचा व देवाचा प्रिय संलापच होय. किंबहुना देवच जीवाच्या हृदयातून प्रार्थनेच्या रूपाने व्यक्त होतो. तेव्हा प्रार्थनेचे शब्द म्हणजे देवाचे सगुणत्व, देवाचे मधुर बोल होता.

जलालउद्दीन रूमी या सुफी साधुच्या मस्नवी ग्रंथात, एकदा एक इसम देवास मोठ्याने हाका मारीत होता, ते पाहून सैतानाने त्याचा उपहास केला परंतु देवाने आपल्या दूताकरवी त्यास संदेश पाठविला त्याचा भावार्थ असा.

"तू मला हाक मारावीस म्हणूनच मी तुला निर्माण केले तुझे 'प्रभु' म्हणून हाक मारणे याचा अर्थ "मी येथे आहे" म्हणणे होय. तुझ्या हृदयातील माझ्या भेटीविषयी वेदना, उत्कंठा व उत्सुकता म्हणजे माझ्या आगमनाची सुचिन्हेच होत. तुझे सारे प्रयत्न म्हणजे माझी आकर्षकताच होय. तुझी भीति, तुझे प्रेम म्हणजे माझी कृपाच होय".

प्रार्थना ही दिसावयास थोड्याशा शब्दांचा समूह दिसतो. पण ते शब्द साधे नसतात, ते शब्द मानवी मुखातून बाहेर पडलेले दिसतात, परंतु प्रभुच्या कृपेचे ते प्रत्यक्ष प्रवाहच होत. मनुष्याने देवाला कळवळून हाक मारणे "देवा! तू मला का रे भेटत नाहीस?" म्हणून टाहो फोडणे हे प्रभूचेच जीवाला आपल्या जवळ घेऊन दृढ आलिंगन देणे होय.

म्हणून संतांनी प्रभूला वारंवार करुणा वचनानी आळविले आहे. ज्या शद्वात त्यांनी आळविले ते शद्व म्हणजे जगाला त्यांनी दिलेली अमोल देणगीच होय. प्रभूला आळविणे म्हणजे प्रभुच्या कृपेच्या स्तनातून प्रेमपान्हा पिणे होय. त्यातच प्रभूशी सहज संगम होतो. हेच आवडीचे जीवदान होय. जीवनात ही माधुरी चाखली तरच जिवंतपणा होय नाही-तर जगण्यात काय गोडी? प्रभुला आळविणे म्हणजे ब्रह्मरसाचे सेवन होय. नुसते कोरडे ब्रह्मज्ञान काय उपयोगाचे, ब्रह्माच्या उदरातील रस प्राशन करावयास मिळाला पाहिजे, श्री ज्ञानेश्वर माऊलीने याच अर्थाने "तत्वमत्स्यादि महावाक्यम् उपदेशू! नामावा अर्थ नाही तेथे। 'तत्वमसी' नुसते समजून काय उपयोग? त्याची गोडी चाखिली पाहिजे. ती न मागता चाखता येते. प्रभुला आळविणे म्हणजेच प्रभूच्या चरणाचा अखंड वास होय हेच जीविताची परमश्रेष्ठ पुण्याई आहे. या आळविण्याची गोडी इतकी आहे की एकदा तिने जीवनात प्रवेश केला की तिच्या खेरीज सर्व रस फिके वाटतात आणि जागृतीत तीच गोडी भरपूर भरून जाऊन समग्र जीवनच गोडीरूप होऊन जाते.

प्रार्थनेमुळे निर्माण होणारी अध्यात्मिक शक्ती साठवून तिचा हवा तेव्हा उपयोग करता येईल असे यंत्र तयार केल्याचा दावा डॉ. जॉर्ज किंग या इंग्लिश संशोधकाने केला आहे. युद्ध, महापूर किंवा दुष्काळ अशा आरिष्टांच्या वेळी हे साधन वापरता येईल असे त्याचे म्हणणे आहे. त्यांनी तयार केलेल्या प्रार्थनाबॅटरीत दोनशे लोकांनी म्हटलेल्या प्रार्थनांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रार्थनांची शक्ती केव्हा मुक्त करावयाची याचा निर्णय घेण्यासाठी एक समितीही नेमण्यात आली आहे असे डॉ. किंग यांनी लंडन येथे भरलेल्या 'योग-मेळाव्यात' सांगितले. त्यांनी तयार केलेल्या यंत्राचे स्वरूप तिकाट-ण्यावर बसविलेल्या एखाद्या कॅमेऱ्यासारिखे आहे. त्याच्या पुढे उभे राहून प्रथम एक संस्कृत मंत्र म्हणण्यात आला व नंतर पांच जणानी सर्वांच्या वतीने निरनिराळ्या प्रार्थना म्हटल्या. आफ्रिकेतील दुष्काळ नाहीसा करण्यासाठी पाऊस पडावा म्हणून या शक्तीचा उपयोग करण्याचा आपला विचार आहे असेही डॉ. किंग यांनी सांगितले. डॉ. किंग हे ॲथेरियस सोसायटी या धार्मिक संघटनेचे प्रमुख असून शुक्र-ग्रहावरून आलेल्या संदेशा-नुसार आपण या संघाची स्थापना केली असे ते सांगतात. (महाराष्ट्र टाईम्स ता. १७-८ ७३) असो.

संत गोरोबाकाकांनी विठाई माऊलीला हाक मारून, प्रार्थना करून तिचे प्रेम प्रत्यक्ष कृतींत सगुण भोगले. संत गोरोबाकाका हे जातीने कुंभार व धंदा मडकी करण्याचा. त्यांनी आव्यात मडकी घालून त्यावर निखारे फुलविले, आता दोन तीन दिवसात मडकी होताच भाजून ती बाजारात न्यावयाची, तोवर नवीन मडकी घड-विण्याकरिता, चिखल, माती, तुडवीत व श्रीपांडुरंगाचे गोड भजन गात काम चालू होते.

आवा भरला त्यावेळी त्यांच्या घरातील मांजरी बाहेर भक्ष्य शोधावयाला गेली होती, ती नुकतीच व्यालेली असून तिने आपली पिल्ले एका कच्च्या मडक्यात ठेवली होती. गोरोबांना हे माहित नव्हते. ते मडके सहजपणे ओळीने लावता लावता आव्यात रचले गेले.

आवा सर्व बाजूने पूर्ण पेटला; इतक्यात ती मांजरी आली पहाते तो सर्व मडकी आव्यात असून आवा संपूर्ण धगधगीत जळू लागला आहे. आव्यात आपली पिले सापडली म्हणून ती मांजरी आव्यात शिरण्याचा प्रयत्न करी व अंगाला आगीची झळ लागताच ओरडत परत फिरे.

मांजरी सारख्या आर्तस्वराने घिरट्या घालीत असलेली पाहून, तिची पिले आव्यात अडकलेली आहेत हे गोरोबाकाकांच्या लक्ष्यात आले; पण करणार काय? नीलज्वाला त्या भट्टीजवळ दहा पावलावर देखील येऊ देत नव्हत्या आपल्या हातून फार मोठी चूक झाली माझ्या नजरचुकीने पिले आव्यात अडकली "पांडुरंगा" काय करूं? हे असे कसे झाले? त्या बाळांचे आता काय होईल? विठ्ठला ! या मांजरीचा प्राण कसा काकुळतीला आला आहे? तू सर्वसमर्थ मायबाप आहेस. तू प्रल्हादाचे आगीत रक्षण केलेस, तुझ्या मनांत येईल तर काय होणार नाही? बापा! सर्व भक्ताचे तू आपल्या निजप्रीतीने रक्षण केलेस. आता या दिव्यातून ही पिले बाहेर काढून आपले कृपाळूपण मलाही दाखव. दाखवशील ना?" असे म्हणून त्यांचा जीव व्याकुळतेने श्रीविठ्ठलाचा धावा करू लागला. त्यांच्या चित्ताला आपला धंदा अगर जेवणखाण सुचेना, अंतरी एकच ध्यास लागून पांडुरंगाने ती बाळे पूर्ववत रक्षण करावीत म्हणून त्यांनी भजनाला आरंभ केला. भजनात एकच आठव प्रभु त्या पिलाना पोटाशी धरून बसला असेल का? "देवा! पुराणे तुझी कीर्ति गातात, आता आम्हाला आमच्या डोळयानी त्यातले काही पहायला मिळणार नाही का? प्रभुराया! जीवाच्या जीवना, प्रेमळाच्या प्रियोत्तमा, कृपेच्या सागरा, तुझी प्रियशक्ति आता या पिलांची पाखर होऊ दे आणि माझ्या डोळयाना तुझे साऊली रूप पाहू दे. तू सर्वसमर्थ दयाळू आहेसच, एकवार ते सगुण होऊन मला भेटू दे" मधून मधून ज्ञानेश्वर माऊलीचे संतांचे नामस्मरण करावे. श्री विठ्ठल विठ्ठल असे गाऊन नाचावे. मायबाप सांभाळीलच असा विश्वास वाटावा. पण प्रत्यक्ष डोळयानी पाहिपर्यंत धीर निघू नये अशा तळमळीच्या अवस्थेत सारख्या तीन रात्री व तीन दिवस निघून गेले. मांजरी बिचारी ओरडून ओरडून थकून जवळच निपचीत पडली होती. दोघांच्याही पोटात पाण्याचा अगर अन्नाचा लवलेश नव्हता. आवा अखेर तीन दिवसांनी निवाला.

गोरोबानी आवा काढण्यासारखा झाला आहे हे पाहताच 'पुंडलीक वरदे हारि विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम" असा गजर करून करून हळू हळू तो काढण्यास सुरवात केली. काढताना मुखाने 'श्री विठ्ठल ,माऊली बिठ्ठल, बाप विठ्ठल, सखा विठ्ठल, असे भजन चालूच होते. एकेक गाडगे उचलावे आतून काही आवाज हालचाल दिसते का पहावे. गाडग्यात काहीच नाही असे दिसताच ते बाजूला ठेवावे, असा क्रम बराच वेळ चालला होता. पिलांची हालचाल, ओरडणे बराच वेळ ऐकू आले नाही तेव्हा जिवाची अत्यंत घालमेल झाली. देवा संतांचे हे भजन सारे वाया गेले का? असा जीव अत्यंत काकुळतीला येऊन निराश झाला होता. इतक्यात दूर खाली पिलांचा मंद स्वर कानी पडल्यासारखा

झाला. हा भास तर नव्हेना असेहि त्याना वाटले. पण मांजरी त्या आवाजाने तेथे धावत आलेली पाहताच पिलांचाच तो आवाज आहे अशी त्यांची खात्री पटली व जेथून तो आवाज आला ती मडकी बाजूला काढू लागले. प्रभुने आपली प्रार्थना -धावा ऐकला म्हणून अनावर प्रेमाने गहिवर येऊन त्यांच्या डोळ्यातून अश्रूचे लोट चालले. 'देवा! शेवटी तू माझी विनवणी ऐकलीस? या पामराला तू आपले म्हटलेस असे म्हणून ती गाडग्यातील पिले मांजरीपुढे ठेवली. तो त्या पिलांना पोटी घेऊन त्यांचे सारे अंग चाटू लागली. इवल्याशा त्या जीवाचे मातृप्रेम पाहून गोरोबाकाकांना वाटले, 'प्रभु ही जीवाची माता होऊन त्यांचे सर्वांग प्रियकल्लोळाने असेच सांभाळीत असतो, नाहीतर या मांजरीला तरी हे प्रेम कोठून जागे झाले? प्रभुरे! तुझी प्रीति अगाध आहे इवल्याशा अणूरेणूत आणि सर्व विश्वरूपांतही तू प्रेमाने जीवन राखीत आहेस. माझ्या जीवात ही तू असाच सारखा जागत आहेस हे आमच्या जीवात केव्हा उमगणार?

मांजरी इकडे पिलांना चाटते आणि गोरोबाकाका ते दृश्य नव्हे ते प्रभुदर्शन पाहून 'तू माऊलीहुनी मायाळ' म्हणून भजन करू लागले, 'माऊली , विठाई, विठाई माउली असे गाऊन नाचून त्यांनी प्रभूला कितीतरी आळवला, आपल्या आवडीची तृप्ती झाल्यावर त्या मांजरीच्या पिलांना त्यांनी दूर सुरक्षित असे घरकुल करून दिले.

प्रार्थनेच्या आळवण्याच्या गोडीचा झरा अंतःकरणात वाहू लागल्यावर देव भेटावा का न भेटावा, यावा का न यावा ही भाषा उरत नाहीं देव या गोडीस लांचावलेला असतो. यावरून मानवी जीवनांत प्रार्थनेचे स्थान किती श्रेष्ठ आहे ते कळून येईल.

श्री गोरोबाकाका यांनी प्रभु विठ्ठल जसा 'आई' म्हणून आळवला तसाच तो आपणालाही आळवता आला पाहिजे. त्याला गोरोबाकाका प्रमाणे आव्यातच पिले कशाला अडकावयाला पाहिजे? आपल्या नित्य व्यवहारात आणि विशेष येणाऱ्या अडचणीत प्रभुचे पालन आपले ध्यानी येऊन त्या रक्षणाच्या प्रत्यक्ष अनुभवाने 'माऊली विठाई' म्हणून संताप्रमाणे आपणाला गाता आले पाहिजे. नडीच्या वेळी हट्ट करिता आला पाहिजे. विशेष कर्मे घडण्यातच प्रभुसुख नाहीतर ते प्रभुला मायबाप ओळखून त्याप्रमाणे आळवून प्रेमसुख भोगण्यात आहे.

ॐ तत् सत्

# बाल मुकुंद

प्रा. डॉ. श्रीराम पंडित

मार्कण्डेय नावाचे अतिशय विद्वान व संयमी असे ऋषी होते. मृकण्डऋषीचे पुत्र म्हणून त्यांचे नाव मार्कण्डेय. पित्याप्रमाणेच ते वेदविद्यापारंगत झाले. वल्कले धारण करून व भिक्षावृत्तीने राहून त्यांनी उग्र तपाला आरंभ केला. ब्रह्मा, शिव, दक्ष व इतर देव त्यांचे ते उग्र तप पाहून चकित झाले. इंद्राने त्यांचा तपोभंग करण्याचे ठरविले. पुष्पभद्रा नदीजवळच्या आपल्या पवित्र आश्रमात मार्कण्डेय ध्यानस्थ बसले होते. त्यांच्या तपात व योगसाधनेत विघ्न आणण्यासाठी इंद्राने कामदेवाला गंधर्व व अप्सरांसहित तेथे पाठविले. कामदेवाच्या मार्गदर्शनानुसार त्या सर्वांनी कामोद्दीपक नृत्य, गीत यांचा उपयोग करून मार्कण्डेयांचे मन विचलित करण्याचा प्रयत्न केला. उद्दीपक वातावरण निर्माण करून कामदेवाने आपला फुलांचा प्रभावी बाण त्यांच्यावर सोडला. परंतु मार्कण्डेय ऋषींच्या मनावर त्याचा यत्किंचितहि परिणाम झाला नाही. त्यांचा संयम ढळला नाही. भगवान-नारायण त्यांचे तपोबल, संयम व त्यांची भक्ती पाहून त्यांच्यावर प्रसन्न झाले व त्यांनी मार्कण्डेय ऋषींना वर मागावयास सांगितले. मार्कण्डेय ऋषींना साक्षात् भगवान् नारायणाचे दर्शन झाल्याने अत्यानंद झाला. त्यांना दुसरे काही नको होते. त्यांनी ईश्वराची दीर्घकाल स्तुती केली आणि त्यांना भगवन्ताच्या मायेबद्दल अपार कुतूहल असल्याने त्यांनी एक इच्छा व्यक्त केली. ते म्हणाले, "भगवन्, आपली माया अगाध आणि अवर्णनीय आहे. मोठमोठ्या ज्ञानी मुनींना तिचा अंत लागला नाही. ती माया आपण मला दाखवावी". ईश्वराने ते मान्य केले व ते अंतर्धान पावले.

एके दिवशी अचानक मार्कण्डेयांच्या आश्रमात व सभोवताली सोसाट्याचे वारे वाहू लागले. काळेकभिन्न मेघ आकाशात जमले; वृक्ष उन्मळून पडले आणि मुसळधार पाऊस कोसळू लागला. पाण्यात पर्वत बुडू लागले, जलप्रलय झाला. मार्कण्डेय एकटेच त्या प्रलयात भ्रमण करीत राहिले. त्यांची विचारशक्तीच कुंठली. अशा या भयानक संकटात मुनी वेडापिसा झाला. त्यांना आकाश, पृथ्वी, दिशा--कशाचेच ज्ञान राहिले नाही आणि अचानक त्यांना एक वटवृक्ष दिसला. त्याच्या एका पानावर लहानसे देखणे तेजस्वी बालक त्यांना दिसले. आपल्या इवल्या इवल्या हातांनी पायाचा अंगठा आपल्या मुखात घालून ते आपल्या क्रीडानंदात मग्न होते. तोच बालमुकुंद! त्याला काही विचारण्याकरीता ऋषींनी हात पुढे करताच त्याच्या श्वासाने ते बालकाच्या उदरात प्रविष्ट झाले. तेथे त्यांना विश्वरूपाचे, चौदा भुवनांचे दर्शन झाले. त्यांच्या डोळ्याचे पारणे फिटले. ते बाहेर पडले आणि बघतात तो क्षणात सर्व लुप्त झाले. प्रलय, वटवृक्ष, ईश्वराचे बालरूप सर्व क्षणात नाहीसे झाले. भगवान् नारायणाने मार्कण्डेयांना अशा तऱ्हेने आपली माया दाखवली. त्यांनी पाहिलेल्या बालमुकुंदाचे वर्णन एका संस्कृत श्लोकात बहारदाररीतीने केले आहे.

करारविन्देन पदारविन्दं
मुखारविन्दे विनिवेशयन्तम् ।
वटस्य पत्रस्य पुटे शयानं
बालं मुकुन्दं मनसा स्मरामि ॥

सुचलेली काव्य स्फूर्ति

गरुडासम डरवणाऱ्या
कर्कश स्वर वाऱ्याचा
निखळविती सूर्य, चंद्र
वेगी गण ताऱ्यांचा ।

इंद्राचे वज्र हले
फुंफाटी वीज फुटे
कृष्ण मेघ-वृषभांचे
झुंजीतच शिंग तुटे ।

लक्ष लक्ष धारांनी
कोसळती हस्त मेघ
उदधीमधि उठले नग
विझवतील प्रळय-आग ।

अंधारित दाहि दिशा
दारुण हा प्रलयार्णव
नारायण भार्गवास
मायेचा दे अनुभव ।

नच उरली जलसीमा
ताण्डव हे जणुं भीषण
काळ दाढ जलरूपी
भुवनांचा विलयक्षण

दिव्य तेज त्यांत दिसे
अश्वत्थीं मधुर सान
हासे अन् वटपत्रीं
योगेश्वर बालकृष्ण !

——×——

# अनंतता

(न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांच्या अनंतता अभंगावरील विवेचन)

श्री. ना. रा. चिपळूणकर, दादर

सांत दृश्ये सारी, गुंफिली दोऱ्यात
शोभती गजऱ्यात, अनंततेच्या
चिरंवास येथे, तयांचा घडणार
स्खलित ना होणार, एकसुद्धा

(अ. सं. पृ. ४०)

या अभंगात कवीच्या डोळ्यांपुढे आदिशक्तीची रम्य मूर्ति निसर्गसुंदर अशा आश्रमात उभी आहे. तिची पूजा करण्याकरिता, कवी, या सृष्टीतील व त्या आदिशक्तिपासूनच निर्माण झालेली, अनंततेत विलीन होणारी, सांत दृश्ये कालतंतूच्या दोऱ्यात गुंफण्याकरिता व त्याचा सुंदर गजरा करण्याकरिता आपल्या नजरेत साठवीत आहे. तो म्हणतो, अशा ह्या सर्व सांत दृश्यरूप फुलांचा गजरा त्या आदिशक्तिच्या शिरोभागी चिरंतन काळपर्यंत शोभून दिसणार आहे. तेथे त्याचा अखंड वास घडणार आहे. त्यातून एकाही दृश्यरूप फुलाचे स्खलन होणार नाही. तात्पर्य, या जगतात दिसणारी सर्व दृश्ये सांत आहेत. व ती अनंततेत म्हणजे जेथून आली तेथेच आज ना उद्या समाविष्ट होणार आहेत. एक अनंततेखेरीज सर्व सांत असल्याने तेथे विलीन झालेल्या एकाही दृश्याचे किंवा वस्तूचे पुनरवर्तन होणार नाही. आपणा सर्वांना म्हणजे सचेतन प्राण्यांनाही तेथेच विलीन व्हावयाचे आहे, व त्या दिव्य वास्तूत गेल्यावर तेथून पुन्हा स्खलन होऊ नये म्हणून सर्व आटापिटा करावयाचा, व तेच मनुष्याच्या कर्तव्यशक्तीचे ध्येय असले पाहिजे.

आशीर्वाद शाप, अज्ञाचा कोळसा
सहज झाला असा, घात माझा
दुधामध्ये खडा, दुपारी अपरात्र
वैधव्य की येत, विवाहीच
जवळी अनंतता, आलीशी वाटली
तीच नष्ट झाली, क्षणामध्ये

(अ. सं. पृ. ४१)

उपरोक्त अभंगात कवीला म्हणावयाचे आहे की, तपस्येच्या बाबतीत आपली तपस्या ज्या ज्या प्रमाणे वाढत जाईल व इष्ट साध्याची सिद्धि होत जाईल त्यावेळी

कदाचित ती होऊ न देण्याकरिता काही अदृश्य पापशक्ति त्या तपस्येचा भंग करण्यास प्रवृत्त होताल व मनुष्याला लोभाकृष्ट दृष्ये दाखवून त्याला मोहात पाडण्याचा प्रयत्न करतात, व त्या जाळयात मनुष्य सापडताच जवळ आली आलीशी वाटणारी सिद्धि किंवा ध्येय क्षणात दूर निघून जाते. अशा अवस्थेप्रत कवी म्हणतो की, मी प्रयत्न केला परंतु अरेरे, मला मिळालेला आशीर्वाद शापरूप ठरला, जणूकाही पुढे आलेल्या सिद्धान्नाचा कोळसाच झाला. सिद्ध साध्याच्या दुधामध्ये मिठाचा खडा पडला की, दिवसा अपरात्र झाली की, विवाह होताच दुर्दैवे करून वैधव्य प्राप्त व्हावे अशी अवस्था प्राप्त झाली की काय न कळे. माझे अनंततेचे ध्येय शक्तिसामर्थ्याची प्राप्त वेळ येताच मी कोणत्या मोहात पडलो की, ते माझ्यापासून दूर गेले. असे होता कामा नये, तर माझे ध्येय पुन्हा प्रयत्न करून मला गाठलेच पाहिजे. कोळी जाळयावरून सहा वेळा खाली पडला परंतु सातव्यांदा त्याने प्रयत्न करून घर गाठलेच. तोच कोळी आज मला सांगत आहे की, "फिरून यत्न करून पहा."

**जली की चंद्रिका, नाचे वरीखाली**
**मूर्ति तुझी आली, मनी माझ्या**
**मनोलहरींनो, नका हालू जरा**
**सौंदर्य सावरा, अनंततेचे**

(अ. सं. पृ. ४१)

कवीला मागील दृश्यात कोळयाने उपदेश केला की, " फिरून यत्न करून पहा." त्याप्रमाणे त्याने आपल्या इष्टसिद्धीच्या प्रयत्नात काही कसूर न करता पुन्हा आरंभ करून आपला पल्ला गाठला आणि कवीची इष्टसिद्धि त्याच्या प्राप्तीच्या टप्प्यात आली. या सिद्धीचे प्रतिबिंब त्याच्या मानससरोवरात दिसू लागले. जणुकाही ते प्रतिबिंब कवीकडे पाहून आनंदाने नाचू लागले. कारण यावेळी कवी स्खलित झाला नव्हता. धवलगिरीमध्ये म्हटल्याप्रमाणे " कर्मयात्री आपल्या डोळयासमोरच्या सुवर्णपुरुषाच्या सान्निध्याच्या टप्प्यात आला होता. ज्यावेळी तो आपल्या कर्मपशूच्या तावडीतून आपल्या प्रयत्नाने सुटला त्याचवेळी त्याला सुवर्ण पुरुषाचे दर्शन झाले, व ते दर्शन तसेच स्थिर रहावे म्हणून कवी आपल्या मानससरोवरातील लहरींना सांगत आहे की, ज्याप्रमाणे चंद्रिका आपलेच प्रतिबिंब पाण्यात पाहून खालीवर नाचत असते त्याचप्रमाणे आज ही ध्येयमूर्ति म्हणजेच तू, माझ्या मानससरोवरात अवतीर्ण झाली आहेस' तेव्हा हे मनोलहरींनो तुम्ही आता जरासुद्धा हलू नका आणि हे सिद्धीचे दिव्य चंद्रबिंब जरासुद्धा हलू देऊ नका. तर त्याचे सौंदर्य सावरून धरा. कारण तेच आपले ध्येय आहे. तीच आपली सिद्धि आहे व त्याप्रत जाणे किंवा ते आपल्यात सामावून घेणे जड नाही व दूरही नाही. चला, आपण सर्वांनी मिळून त्या अनंततेच्या सौंदर्याचा स्थिर चित्ताने अनुभव घेऊ.

स्मृतींच्या अश्रूंनी, चित्त माझे झाले
डवरलेले डोळे, तुझे जैसे
अश्रु नेत्री तुझ्या, माझ्या मनी गीते
असे का चालले, अनंतते

(अ. सं. पृ. ४२)

आपल्या मानससरोवरावर प्रतिबिंबित झालेले अनंततेचे दृश्य पाहून त्या रम्य दृश्याने व त्यापूर्वीच्या अस्थिर स्मृतीने कवीचे मन भारावून जाते व त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहतात त्याच साश्रु नयनांनी कवी अनंततेला विचारतो की, हे अनंतते, त्या मधुर स्मृतीने व या रम्य दृश्याने माझे चित्त भारावून गेले आहे. माझे डोळे प्रेमाश्रूंनी कौतुकाने भरून गेले आहेत तसेच डोळे मला तुझेही दिसत आहेत यावरून माझ्या तपःश्चर्येचे तुला कौतुक वाटते हे तर खरेच पण अन्यपक्षी तुझ्या डोळ्यात जेव्हा प्रेमाश्रू दिसतात तेव्हा माझ्या मनी तुझ्या आळवणीचे गीत चालू असते. असे का बरे होते? जेव्हा तू माझ्याकडे प्रेमाने पाहिलेस व मला साध्याची इति कर्तव्यता वाटली त्यावेळी माझ्या अश्रूंकडे पाहून तुझ्या नेत्री अश्रू आले पण माझ्या अश्रूंचे माझ्या मनच्या गीतात रूपांतर होतानाही तुझे नेत्री अश्रूच का बरे दिसावेत हे कळत नाही. वास्तविक पाहता आपली दोघांचीही संवेदना एकच असावयास पाहिजे तेव्हा मला माझ्या गीताचे स्वर तुझ्या अश्रूंतून निर्माण केले पाहिजेत व जेव्हा असे घडेल तेव्हाच एकात्मतेचा प्रत्यय येईल.

हृदय माझे असल्या, वृत्तींनी फुलेले
चित्त हे झुलेले, तत्वरंगी
सखी प्रतिभा असली, जिच्या कटाक्षांनी
विश्व हे मोहुनी, सर्व जावे
ध्यान, गान, मनन सदा ऐसे चाले
आनंदात डोले, असा जीव
खरे पाहताना, खोटी ही बोलणी
पोर मी रंगुनी, त्यात जाई
परी अनंतते, तुझ्या पायांवरी
जीवाची बासरी, फेकिली ना?

(अ. सं. पृ. ४२)

या अभंगाशी येताना कवीची अनंततेबरोबर एकात्मतेची साधना पूर्ण झालेली आहे. कवीला त्याच्या मनःश्चक्षूसमोर अनंतता म्हणजे विराट शक्ति की, ज्या शक्तीतून तोही निर्माण झाला आहे व सामावलाही जाणार आहे ती शक्ति मूर्तरूप साकार झालेली आहे, व त्या मूर्तीबरोबर अत्यंत भक्तिप्रेमाने भारावून जाऊन एकसमयावच्छेदेकरून नवविधा भक्तीने ओथंबून जाऊन कवी सखी भावाने बोलत आहे. कारण इतकी जवळीक

धरल्याशिवाय मनीच्या हितगुजाची देवाणघेवाण करताच येत नाही. श्रीरामकृष्ण परमहंस नेहमी म्हणत असत की, आपल्या इष्ट देवताशी, त्या परमात्म्याशी एकरूप व्हावयाचे, आपल्या मनीचे गूज त्याला सांगून त्याचे जाणून घ्यावयाचे असेल तर सखी-भावच धरला पाहिजे. संत मीराबाईचेही अगदी हेच म्हणणे होते. त्या एकवेळ काशीस एका पंडिताचे दर्शनास गेल्या असता त्या पंडिताने " मी स्त्रीचे दर्शन घेत नाही "—असे सांगितले. त्यावर मीराबाईने निरोप पाठविला की, " उभ्या जगतात एका श्रीकृष्णा-वाचून मी दुसरा पुरुषच ओळखत नाही. एक श्रीकृष्ण मात्र पुरुष अन्य सर्व स्त्रिया आहेत." हे उत्तर ऐकताच पंडिताने शरण येऊन मीराबाईचे चरण धरिले.

प्रस्तुत अभंगात कवीची हीच मनस्थिती दृष्टीस पडते. कवी म्हणतो, " माझे हृदय तत्त्वरंगाने झुलून आणि फुलून गेले आहे. विश्वमोहिनी कटाक्षाने माझी प्रतिभा अनंततेच्या मूर्तिप्रत मोहून गेली आहे. ध्यान-गान-मनन वगैरेमध्ये माझा जीव सारखा आनंदाने मोहून डुलतो आहे. एकदा वाटते की, हे सर्व खरे आहे की खोटे आहे. आणि खोटे असले तर एखाद्या वेड्या पोरासारखा मी त्या दृश्यात रंगून गेलो आहे. पण नाही. माझी साधना खोटी नाही. त्याअर्थी माझे साध्यही खोटे नाही, व म्हणून हे अनंतते, हे जगदंबे, हे मायाविनी, तुझे जे साकार स्वरूप मी माझ्यासमोर पाहातो आहे ते सत्यच आहे. मी आतापर्यंत जी साधना केली त्याने मी कृतार्थ झालो आहे, आणि त्या कृतार्थ तेनेच तुझ्या पायावर मी आज माझे डोके ठेवतो, आणि तुला आळविणारी माझी अभंगरूप-बासरी तुझ्या पायावर अर्पण करतो. माझी एवढीच प्रार्थना आहे की, अशीच माझ्यावर नित्य प्रसन्न रहा. व तुला गाईलेले अभंग नित्य अ-भंगच राहोत ! ! !

## कृतज्ञता

गुरुदेव न्या. विनोद यांच्या 'अनंतता' अभंगावरील विवेचन जसे गुरुदेवांच्या प्रेरणेने झाले तसे वाचकांच्या सेवेसी सादर केले. माझे स्नेही कै. दादा परचुरे यांनी मोठ्या प्रेमाने हे विवेचन क्रमशः देण्याचे मान्य केले व मार्च १९७३ पासून आरंभ केला दुर्दैवाने आज ते नाहीत. त्यांच्या प्रथम पुण्य दिवशीच हा अनंतता क्रम पूर्ण करून. त्यांना ही प्रेमाची श्रद्धांजली अर्पण करीत आहे

—चिपळूणकर गुरुजी

# श्रीसाईनाथ स्तवन स्तोत्र

प्रा. डॉ. सौ. चारुशिला गुप्ते

प्रारंभितें स्तोत्र गायना । जय जयाजी गजानना ।
श्रीगुरुसाक्षात् अत्रिनंदना । श्रीसाईनाथा नमो नमः ॥१॥
निर्विकारा निरहंकारा । प्रसन्नवदना ज्ञानसागरा ।
ॐ श्रीकारा निरंतरा । श्रीसाईनाथा नमो नमः ॥२॥
साई माहात्म्य असे अपार । शिवशक्तीचा जो अवतार ।
उदंड दाखविले चमत्कार । श्रीसाईनाथा नमो नमः ॥३॥
दीनवत्सला सद्‌गुरू साई । तुवा उजळली द्वारकामाई ।
भक्त कल्पतरू तूं आमुची आई । श्रीसाईनाथा नमो नमः ॥४॥
ब्रह्मतेजाचा आविष्कार । भक्तगणांचा तूं आधार ।
शरणागतांचा करीशी उद्धार । श्रीसाईनाथा नमो नमः ॥५॥
कोटी सूर्यांची वदनीं शोभा । वैराग्याचा अनुपम गाभा ।
सांवळ्या श्रीरंगा पद्मनाभा । श्रीसाईनाथा नमो नमः ॥६॥
अमृतासम निर्मिली उदी । भक्तांच्या हरती आधीव्याधी ।
धन्य शिरडी पुण्य समाधी । श्रीसाईनाथा नमो नमः ॥७॥
तुझिया मूर्तीचे चिंतन । होईल जेथे रात्रंदिन ।
तूंचि त्यांचे करीशी पालन । श्री साईनाथा नमो नमः ॥८॥

## आरती

जय श्रीसाईनाथा । स्वामी सद्‌गुरु अनंता
आरती ओंवाळितां । हरि भवभय चिंता ॥ध्रृ०॥
कनकदीपा पोटीं । रत्नमाणिकाच्या वाती
पंचप्राण पंचज्योती । उजळील्या गुरुनाथा ॥१॥
सद्भाव पुष्पहार । 'अहं' जाळीला कर्पूर
मुखीं सदानाम गजर । सर्व साक्षी जगन्नाथा ॥२॥
शिरडी वास केला । तुझी अगम्य लीला
भक्तगण धन्य झाला । तव रूप अवतरता ॥३॥
द्यावया जगा सुख । किती करिशी प्रयास
निरामय भक्तवश । निरंजन परमात्मा ॥४॥
धांव घेई गुरुराया । दीनजनां उद्धराया
अघभय निवाराया । पुर्णानंदा तूं समर्था ॥५॥

# प्रताप दोहींचा समसमान

(लेखक—गुरुवर्य द. शं. टिपणीस)

पाप व पुण्य. एक बागुलबोवा तर दुसरे अमिष. एक बडगा तर दुसरा मधाचा वाडगा. एकाला शिक्षा तर दुसऱ्याला बक्षीस, एक नरकाची वाट तर दुसरा स्वर्गाची वाट. एक ऋण तर दुसरा धन, हा धन पुढे ऋण होतो. म्हणजे दोन्ही वाटा शेवटी कर्त्याची वाट लावतात. पापपुण्याची कल्पना सुंदर आहे. ज्या बुद्धीत ही कल्पना उगवली त्या बुद्धीचे केव्हाही कौतुक केले पाहिजे. लोकांनी कुमार्ग टाकून त्यांनी सन्मार्गाने चालावे हा त्यामागील उद्देश. लोकांसमोर पापाची भीति उभी करून, पुण्यामुळे मिळणाऱ्या सुखाची लालूच दाखवून त्यांना सदैव सन्मार्गावर ठेवण्याची आपल्या पूर्वजांची ही युक्ति नामी तर खरीच व समाज स्थिर राहण्यास तिचा उपयोग होतो हे ही खरेच. पाप केल्याने माणसास नरकात जावे लागते. त्याला दुःख, हालअपेष्ठा भोगाव्या लागतात. त्याच्या वाट्यास खडतर जीवन येते. पुण्य केले तर स्वर्ग मिळतो. स्वर्गसुख लाभते. जीवनात ऐश्वर्य, आनंद व नाना भोग भोगायला मिळतात, यास्तव लोक पाप करण्यास घाबरतात व ज्या पुण्यकर्माने स्वर्गसुख मिळते ते करण्यात त्यांना आनंद व उत्साह वाटतो, यामुळे सामाजिक कुकर्मांना आळा बसून सत्कर्मे वाढीस लागतात व समाजाची प्रगती होत राहते, ऐहिक व्यवहारदृष्टचा हे विचार योग्य आहेत यात संशय नाही. पण जे पापाच्या भीतीला भीक घालीत नाहीत व पुण्याच्या अभिषाला वश होत नाहीत अशा अलिकडच्या तरुणांचे काय ? ज्या काळात पाप-पुण्याच्या कल्पना उदयास आल्या व मान्य केल्या गेल्या तो काळ व आजचा काळ यात किती अंतर पडले आहे म्हणाल तर तीन वर्षाचे मूल व तीस वर्षाचा तरुण यांच्यामधील मानसिक अंतराइतके अतिसुंदर पण तीन वर्षाच्या मुलाचा अंगरखा तिशीच्या तरुणाने, केवळ तो सुंदर म्हणून घातलाच पाहिजे असा अट्टाहास कोणी केला तर त्याला आपण काय म्हणू ? आज ज्ञान (आध्यात्मिकदृष्टचा अज्ञान) इतके प्रगत झाले आहे व क्षणोक्षणी होत आहे की त्याच्या प्रकाशात वावरणाऱ्या तरुणाला ५—१० हजार वर्षांपूर्वीच्या कल्पना व मते पटावीत कशी ? शिवाय पाश्चिमात्य पार्सल मधून आलेला माल आजच्या तरुण मनाला अधिक पटत असतो. ग्रहण, सूर्य फिरतो, वर आकाशात स्वर्ग आहे व तेथे देव राहतात वगैरे कितीतरी कल्पना भ्रमक आहेत हे विज्ञानाने सिद्ध केले आहे. आकाशालाच अस्तित्व नाही मग स्वर्ग असणार कुठे आणि देव राहणार कुठे ? भूतकालीन समजूती व कल्पना खोट्या ठरविणाऱ्या आजच्या शास्त्रीय युगातला तरुण म्हणतो की पाप करून याच जन्मी याच देही स्वर्ग सुख भोगावयास मिळते मग पुण्याची उद्याची उधारी करा कशाला ? रोख व्यवहार चांगला नव्हे का? वायदेबाजार धोक्याचाच नाही का ? विज्ञानाने विचारात क्रांती होत असते. यामुळे पाप-पुण्याची कल्पना हल्लीच्या शास्त्रीय जगात जशी खपण्यासारखी नाही तशीच ती काही मर्यादेपलीकडे अध्यात्मातही खपवली जाणार नाही.

खरं म्हणजे माणसाने पापही करू नये व पुण्यही करू नये. पाप करू नये हे बहुतेकांना मान्य होईल. बहुतेकांना कारण काही असे आहेत की ते पापबीप जाणत नाहीत. त्यांच्यापुरता करू न करू हा प्रश्नच उद्भवत नाही. फायदा होतो ना, मनात आलं ना मग केले. मग ते पाप असो नाही तर पुण्य असो. आजचा बहुतांशी तरूण वर्ग अशा पैकी आहे. नास्तिक, आधर्मिक म्हणून आपण त्यांची हेटाळणी करतो. पण ते योग्य नाही. पाप नाही एवढ्या विचारापुरते त्यांना क्रांतिकारी महात्मे म्हणावयास हरकत नाही. कुठून कसा काय कुणास ठाऊक आध्यात्मिक विचारच त्यांच्या डोक्यात घुसलेला दिसतो. कारण पाप नाही असे सांगताना न कळत ते ती व्यक्त करतात. अशांचा प्रश्न निराळा, पण आपण सर्वसाधारण संसारी माणसं काही करू शकू तर ते पापच. पुण्य करतो असं आपण म्हणतो व म्हणतो म्हणूनच पुण्याचे पाप होते. डॉक्टरकडील गोळी गोड लागते खरी पण खरोखरीच ती गोड असते का? सुरुवातीस गोड पण अंती कडूच. तसंच ऐहिक पुण्य हे अंती पापच ठरते. पुण्यातून पापाचा जन्म होऊ शकतो. पुण्य आपणास करता येत नाही. व मिळवता येत नाही. ते होऊन मिळते, ऊन नाही का, आपली इच्छा असो वा नसो आपण होऊन आपल्या दारी येते, उन्हाळ्यात आपणास नकोसे असते म्हणून का ही कोणी ते नाहीसे करू शकत नाही. पाप नको पुण्य पाहिजे, खरं. पण ते आहे कुठे आपल्या हाती ? नियतीच्या नियमाप्रमाणे जे यायचे ते आपल्या दाराशी येईलच व ते आपणास घ्यावे लागेल. पुण्य येईल ही पण जाताना कदाचित आपल्या गळ्यात पाप बांधून जाईल. अगदी डॉक्टरच्या गोळीप्रमाणे. गोड सरून कडू राहील. हे सर्व विचार विक्षिप्त व वेडेपणाचे वाटतील. वरवर पहाता तसे ते दिसतातही. आपल्या संतांनी यातील वेडेपणाचा बाजार ओळखला होता म्हणून ते कधी या बाजारात फिरकले नाहीत की पापपुण्याच्या चक्रात सापडले नाहीत. ऐहिक पुण्य कितीही चांगचे फलदायी वाटले तरी अंती ते ९९ टक्के पाप उत्पन्न करते. अर्थात हे पटले नाही, हे जाणतो, अधिक खोल विचार करूया व पाहूया ऐहिक पुण्याच्या पोटी पाप कसे दडलेले असते ते.

पाप व पुण्य या कल्पना सापेक्ष आहेत. जे सापेक्ष आहे त्याला मुळात अस्तित्व नाही, जे आश्रयाने राहते ते स्वतंत्र नसते. गाडीत असताना बाहेर पाहिले की घरे दारे झाडेझुडपें पळत आहेत असे वाटते, ते गाडीच्या पळण्यामुळे. गाडी थांबली की त्यांचे पळणे थांबले. झाडेझुडपे वगैरेंच्या पळण्याला अस्तित्व नाही. ती कधी पळू शकतील का? पण तसा भास होतो. त्यांचे पळणे सापेक्ष आहे. गाडीच्या पळण्यावर ते अवलंबून आहे. हे पळणे जसे तसेच पापपुण्य, चांगले वाईट यांचे आहे. चांगले करणे म्हणजे पुण्य व वाईट करणे म्हणजे पाप हा आपला सर्व सामान्य ढोबळ समज. पण चांगले कशाला म्हणावयाचे व वाईट कशाला म्हणावयाचे याचा विचार करू लागले की बुद्धीचा गोंधळ होतो. जे आज चांगले समजू ते उद्या वाईट ठरते. कालचे चांगले आजचे वाईट होते, चांगले वाईट म्हणजे बदलते पाणी. साठ सत्तर वर्षांपूर्वी शेंडी उडविणे

व मिशा काही प्रसंग सोडून सफाचाट करणे हे फार फार वाईट होते, धर्मविरुद्ध होते. पण आज ३/४ हिंदुधर्मीयांना शेंड्या नाहीत व मिशांना खुशाल लहरीप्रमाणे वागवले जाते, पण ते आता कोणी वाईट समजत नाही. समाज टीका करीत नाही. शंभर वर्षांपूर्वी एखाद्या ब्राह्मणाने अंडीमटणावर ताव मारला असता तर तो वाळीत पडगा असता केवढं पाप अब्रह्मण्यं शिव शिव, असं समाज ओरडत सुटला असता. पण आज पौष्टिक आहार म्हणून तो सर्रास चालू आहे. घरी दारी सर्वत्र व समाजाची त्याला मान्यताही आहे. धर्म तोच राहिला पण पूर्वीचे पाप अब्रह्मण्यं, शिव शिव गेले. मुद्दा काय की पाप पुण्य, चांगले वाईट या कल्पना आहेत. यांना कायम अस्तित्व नाही. परिस्थितीप्रमाणे त्या बदलत असतात. या कल्पना म्हणजे सरकती फळी. तीवर आपण उभे राहिलो तर आपला तोल नाही का जाणार ? नव्या जुन्या फळ्यात संघर्ष झाला तर नवल काय ? एकेकाळी या कल्पना समाजात सदाचार राखण्यात उपयुक्त होत्या, पण आजच्या चिकित्सक बुद्धीला त्या मान्य व्हाव्यात कशा? असं असल्यामुळे चांगले व वाईट हे निश्चित ठरवणारे असे काही अध्यात्मात मिळते की काय.याचा शोध घेतला पाहिजे व असं काही मिळाले तर त्याने तरुण चिकित्सक बुद्धीची समजूत पटेल व जे काही निरर्थक संघर्ष समाजात व धार्मिक गोष्टीत होत असतात त्यांना आळा बसेल. पण असा शोध घेण्यापूर्वी वर जे म्हटले आहे की ऐहिक पुण्याच्या पोटी पापाची बीजे असतात व अंतीं पाप व पुण्य यांचे फलित सारखेच येते म्हणजे दुःख व हाल अपेष्टा यांचीच प्राप्ती होते. त्याचा जरा खुलासेवार विचार करू.

पापपुण्याची कल्पना हिंदू मनात इतकी खोलवर रुजली आहे की ऐनवेळी मी मी म्हणणाऱ्यांचा बुद्धिभ्रंश होऊन हे करावे की ते करावे अशा हॅम्लेटी चक्रात ते सापडतात. अर्जुनासारखा ज्ञानी पुरुष पण त्याच्याही बुद्धीला पापपुण्याच्या कल्पनानी इतके ग्रासले की शेवटी गलित धैर्य होऊन तो स्वस्थ बसला. स्वजनांना मारले तर फार मोठे पाप आपल्या हातून होईल या भीतीने त्याचे मन ग्रासले गेले. लढाईत जिंकलास तर पृथ्वीचे राज्य भोगशील व पतन पावलास तर स्वर्गाचे राज्य भोगशील अशी आमिषे दाखवून याच्यातील वीरपुरुष जागा करण्याचा श्री कृष्णाने प्रयत्न केला. परंतु अर्जुनाच्या मनाला पापाची एवढी मगरमिठी होती की ती काही असल्या व्यावहारिक भाषेने सुटेना. तेव्हा श्रीकृष्णाला गीतेच्या रूपाने त्याला बरचंस काही सांगाव लागल. श्रीकृष्णाच्या सांगण्यात एक गोष्ट अशी भासते की काही वेळा पाप हे पुण्यकारक होत असावे. कारण कृष्ण स्वजनाना मारण्याचे पाप करायला सरळ सरळ सांगत होता व वरती म्हणत होत की तुझा फायदा होईल तुला राज्य मिळेल, असं असतं तर मग ऐहिक पुण्यापासूनही काही वेळेला वाईट फायदे मिळत असावेत आणि म्हणून ऐहिक पुण्याच्या पोटी पाप उदयास येते असे म्हटले तर ते निखालस चूक ठरू नये, कसे पहा.

पुण्य केले तर स्वर्ग मिळतो, स्वर्ग सुख म्हणजे कनक कामिनी वगैरे ऐश्वर्य मिळते, विशिष्ट पुण्य केले, फार फार पुण्य केले की स्वर्गातील इंद्रपद प्राप्त होते. इंद्र म्हणजे ऐश्वर्याची व सुखाची कमाल मर्यादा, असे आपण समजतो. इंद्राचे ऐश्वर्य भोगती आहे बेटा असे आपण गौरवाने म्हणतो. पुराणे असेही सांगतात की पुण्यक्षय झाल्यावर इंद्राचे पतन होऊन तो पुन्हा पृथ्वीवर जन्म घेतो व त्याच्या गादीवर दुसरा पुण्यपुरुष येतो. इंद्राचे आसन सदैव डळमळित असते व त्याला पतन भय असते. अधिकार हरणाची चिंता त्याला जाळीत असते. भोग भोगताना कळत न कळत त्याच्या हातून पापे होतात. त्यामुळे मृत्युलोकात आल्यावर त्याच्या वाट्यास दुःख हाल अपेष्टा येतात. अशा प्रकारे स्वर्ग हा अंती उपसर्ग होतो. हां पुराणातला दाखला झाला, आजच्या चिकित्सक बुद्धीला पुराणे म्हणजे भाकडकथा वाटतात. त्यामुळे पुराणातील वांगी पुराणातच ठेवून रोजच्या व्यवहारातील आपल्या नजरेसमोर घडणारा दाखला घेऊ.

श्रीमंती ऐश्वर्य ज्याच्याकडे आहे त्याला आपण भाग्यवान समजतो. पूर्वजन्मींची पुण्याई फळास आली असे म्हणतो. एकादी मुलगी श्रीमंत घराण्यात पडली व तिच्या अंगावर नाना अलंकार चढले की समाज विशेषतः स्त्रीसमाज म्हणतो, नशीब काढले मुलीने. आता मुलीने नशीब काढले की नशिबाने तिला वेढले याचे उत्तर येणारी वर्षे जे देतील तिकडे अर्थात कोणाचे लक्ष नसते, समोर दिसलं त्यावरून भाग्यवती म्हणून मोकळे. धन ऐष आराम, सर्व प्रकारची सुखे मिळणे म्हणजे मृत्युलोकीचे इंद्रपद मिळणे हा पुरुषांचा समज व शरीर वाकवतील एवढे भारंभार दागिने मिळणे म्हणजे इंद्रायणी होणे हा स्त्रियांचा समज. विचार करा. हे सर्व मिळते त्याचवेळी मी मोठा, मी भाग्यवान, मी श्रीमंत असा अहंकार घरात घुसतोच. हा अहंकार स्वार्थ व कांचन कामिनीचा लोभ वाढीस लावतो अग्नीत तूप ओतल्याने अग्नि विझत नाही उलट अधिक भडकतो. पैसा मिळत गेला की पैशाची हाव वाढते. हीच गोष्ट कामिनीसंबंधी. मूळचा डोळस असला तरी अहंकार, स्वार्थ व विषयवासना यांमुळे त्याच्या डोळ्यांवर श्रीमंतीचा धूर येतो. न्याय-नीति, पवित्र-अपवित्र, चांगले-वाईट काहीच त्याला दिसत नाही. मग कांचन कामिनीच्या तृष्णेमुळे भले बुरे काय वाट्टेल ते तो करतो व स्वतःच्या हाताने स्वतःसाठी पापाच्या राशी निर्माण करतो. शेवटी याच राशी त्याच्या राशीला बसून ऐश्वर्याचे सुख उधळून लावतात व दुःखाच्या खाईत त्याला लोटून देतात. अधिकार मिळाला तर अधिकाराचा मद निर्माण होऊन तो इतरांशी तोऱ्याने वागतो व आपला अनंत स्वार्थ साधण्याच्या नादी लागून भविष्य काळासाठी पापाची बेगमी करून ठेवतो. समजा एकाद्या गरिबाला

लॉटरीत तीन लाखांचे बक्षीस मिळाले, पुण्य फळास आले हे निःसंशय, पण ते भोगताना काय होते ? गरिबी जाऊन एकाएकी श्रीमंती आली तर कित्येकांचे डोळे फिरतात; कित्येक हर्षवायूत मरतात, तर कित्येकांना चोरांची चिंता जाळते. उपाशी माणूस एकाएकी मिळालेल्या पंचपक्वान्नावर आधाशीपणे तुटून पडतो व अजीर्णाचे दुःख भोगत बसतो तसे एकाएकी मिळालेल्या संपत्तीमुळे नाना प्रकारचे भोग, चांगले वाईट लक्षात न घेता कित्येक आधाशीपणे भोगू लागतात. असं करताना त्यांच्या हातून नाना पापे होतात. बँकेतून पैशाची गठणी घेऊन बाहेर पडावे तो टपून बसलेले चोर, लुटारू त्या गठणीवर धाड घालतात. तद्वत् पैशाच्या परिसरात दबा धरून बसलेले अहंकार, लोभ, इर्षा, मद, मत्सर आदी वाटमारे श्रीमंतीवर धाड घालून श्रीमंताला पैशाऐवजी पापाचा धनी करून ठेवतात. जास्तच जास्त पुण्यामुळे मिळणाऱ्या ऐहिक वैभवाची अंती अशी वाट लागते. म्हणूनच म्हटले आहे की पुण्याच्या पोटी पापाची बीजे असतात. म्हणूनच साईबाबा पुंडलिकरावाना म्हणाले––पुण्याचाचि काय अभिमान । पापाचा का नाही अभिमान । प्रताप दोहींचा समसमान । म्हणून निरभिमान वर्ते तूं ॥ (अ. ५१ ओ. १७८) एकनाथी भागवत सांगते की अमृत म्हणून मद्यपान केले की अंगी पिशाचत्व येते. (म्हणजे पतन होते. स्वर्गसुख अमृत वाटते पण गुणाने मद्यासारखे असते.)

तैसे केवळ पतनात्मक । त्या नाव म्हणती स्वर्गसुख ।
जाणोनि प्रवर्तती ते मूर्ख । फळकामुक अभिलाषी ॥
उंडणी लंघू न शके भिंतीसी । तरी चढो रिघते सायासी ।
चढता पडे आपैसी । तेवी स्वर्ग सुखासी दृढ पतन ॥अ. ५, ओ. ९२–९३.

पारध्याचा बाण चुकून कृष्णाच्या पायाला लागला, तेव्हा आपल्या हातून भयंकर पाप घडले म्हणून तो दुःखीत झाला. तेव्हा कृष्ण त्याला सांगतो––मिथ्या धरोनि देहाभिमान। म्हणसी घडले पाप पूर्ण । त्याही पापाशी पुरश्चरण । माझे दर्शन मुख्यत्वे. (अ. ३०, ओ. ८७) पाप पुण्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ज्या नाण्याच्या आश्रयाने त्या आहेत ते नाणे नाहीसे झाल्याखेरीज पाप पुण्य दोन्ही नाहीशी होणार नाहीत व माणसाला खरे सुख मिळणार नाही. अशा प्रकारे जे सापेक्ष आहेत व ज्यांचा अंती प्रताप सारखा आहे अशा पाप-पुण्यासाठी काहीही करू नये.

मग कोणासाठी करावे ? कसे करावे ? हे प्रश्न आलेच. आता त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करू. चांगल्यासाठी चांगले करावे की ज्यायोगे आपणास पाप वा पुण्य काहीच लागणार नाही. झालं, सगळाच घोटाळा केलात. अहो, तुम्ही स्वतःच स्वतःला छेद देत आहात. तुम्ही म्हणालात की चांगले वाईट सापेक्ष आहेत. मग त्यांचा कसा आधार घेता येईल ? शिवाय काही केले म्हणजे कर्म केले की त्यांचे चांगले वाईट, पाप, पुण्य, फल मिळणारच, आणि आता सांगता आहात असं करा नि तसं करा. भलतंच काही तरी बोलता आहात ,राव नाही. भलतच नाही. काहीतरी चांगलं स्थिर चिरंजीव आहे. ते सापेक्ष नाही उलट त्याच्या आश्रयाने राहणारी ही सर्व स्टडी सापेक्ष आहे. शिवाय प्रत्येक कृतीला कर्माला पाप-पुण्याची फळे आलीच पाहिजेत असं नाही. मुळीच नाही. निश्चित नाही. त्रिवार नाही असं आपला अध्यात्म सांगतो. बघू या तर अध्यात्म काय म्हणतो ते.

पापाच्या भीतीने एखादी कृति टाळायची व पुण्याच्या लोभाने ती करायची ही मानवी वृत्ती दुःख निर्माण करणारी आहे. जे काही करायचे ते ऋतासाठी. ऋताने आपले कार्य करण्यासाठी मानव निर्माण केला आहे. मानव हा ऋताचा दुय्यम (असिस्टंट) आहे. मानव म्हणजे दुय्यम ऋतच आहे. ऋताचे अंशतः अधिकार मानवास मिळाले आहेत. मानवात ऋतच अंशरूपाने आहे. अधिकाराच्या दृष्टीने असिस्टंट कलेक्टरमध्ये कलेक्टर अंशतः असतोच की नाही ? मग या दुय्यमाने आपल्या साहेबाला त्याच्या कामात मदत करणे, त्याचे कार्य चालू ठेवणे हे त्याचे कर्तव्य ठरत नाही का ? तसेच ऋताला मदत करणे हे मानवाचे कर्तव्य नव्हे का ? आहे हो. पण ऋत म्हणजे काय ते तर सांगा अगोदर. ऋताचे अनेक अर्थ करतात. ऋत म्हणजे सत्य परब्रह्म. ऋत म्हणजे विश्वाचा विकास करणारे तत्त्व–विश्वशक्ति, ईश्वर. ज्या नियमांनी हे विश्व चालते, ज्या नियमानी विश्वाचे पोषण होते ते नियम म्हणजे ऋत, हे विश्व चालविणारी कोणती तरी अज्ञात शक्ति आहे व विश्वपोषणाच्या सर्व योजना घडामोडी या शक्तीने ठरविलेल्या असतात. या ऋतापुढे नम्र होऊन (दुय्यमाने साहेबापुढे उद्धटपणा दाखवला तर त्यात त्याचे काय भले होईल ? ) त्याच्या इच्छेस मान देऊन वागणे म्हणजे स्वधर्माचरण करणे होय. काय करावे काय करू नये यांचे मार्गदर्शन करणारा ध्रुवतारा म्हणजे ऋत. या ध्रुवाकडे पाहून मानवाने आपली जीवननौका हाकारली तरच त्याला खरेखुरे सुख मिळेल. ऋताच्या म्हणजे विश्वाच्या प्रगतीस जे साह्य करील ते सत्कर्म, ते चांगले व जे ऋताला विरोध करील, त्याच्या कार्याच्या आड येईल, अडथळे निर्माण करील ते असत्कर्म हे, कोणते करावे व कोणते करू नये, कोणती वागणूक योग्य व कोणती त्याज्य याचे गमक आहे. पाप लागेल वा पुण्य मिळेल हे नव्हे. व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र व मानवच नव्हे तर सर्व प्राणीमात्र यांचे कल्याण ज्यायोगे साध्य होईल त्यांची प्रगती होईल ते सत्कर्म व या विरुद्ध जे जाईल ते असत्कर्म. बदलत्या काळाप्रमाणे कर्तव्याचरणात बदल होत राहील, अशा वेळी हे की ते अशा हॅम्लीटी पेचात सर्वसाधारण जनता सापडण्याचा संभव असतो. अशा वेळी अध्यात्म पहावा, संत पहावे व तसेच समाजधुरिणांनी योग्य त्या स्वआचरणाने जनतेपुढे आदर्श ठेवावा म्हणजे येणारे पेचप्रसंग सुटत राहतील.

सबझूट म्हणणाऱ्यांना अर्थात हे पटायचे नाही. खोल महासागराचे पाणी शार्क आदी हिंस्त्र माशांना पोषक असते तसे तरुण रक्त अहंकाराला फार मानवते. तरुण तर्कशास्त्राची सर्व भिस्त मनगटावर असते. मनगटी घड्याळाप्रमाणे त्यांचा पराक्रम व यश मनगटावर अधिष्ठित असते व घड्याळाप्रमाणे क्वचितच अचूक ठरते. कारण माणसाला जे यश मिळते ते केवळ पराक्रमामुळे नव्हे. पराक्रम हा यश देणारा एक घटक आहे. स्वकर्म (नशिब) स्वप्रयत्न व विश्वशक्तीचे (ऋताचे) सहाय्य यांचा संयोग संच म्हणजे माणसाचे यश. यातला एखादा जरी घटक कमी पडला तरी मानव अपयशाचा धनी होतो. विश्वशक्तीचे सहाय्य तेव्हाच मिळेल की जेव्हा आपले कार्य तिच्या कार्याला सहाय्यभूत होईल, तिच्याशी सहकार्य करून तिच्या अनुरोधाने चालत राहील. वीजेचा वापर तिच्या

नियमास धरून केला तर आपले जीवन सुखी करण्यास ती सहाय्य करील. तसं न केल्यास ती नुकसान करील. आपल्या मनगटाच्या शक्तीचा अभिमान बाळगणाऱ्या एखाद्या तरण्याबांड तरुणाने बेपर्वाईने वीजेला कवटाळले व तो भस्मीभूत झाला तर नवल नाही. आयुष्यात अनेक धक्के (Shocks) खाल्ल्यावर असे तरुण अनुभवाने शहाणे होतात. आईचे न ऐकता लहान मुले तिच्या नकळत विस्तवास हात लावतात व चटका बसल्यावर उलट आईलाच 'आई, हा' म्हणून शिकवतात. अशा तरुणांना शिकवणारी उत्तम संस्था म्हणजे अनुभव विश्वविद्यालय! असो.

ऋताच्या कार्याशी जमेल अशी कृती केली तरी कृती हे कर्म असल्यामुळे त्या कर्माला फल हे येणारच व आपल्या मागची सुख-दुःखे संपायची नाहीत. मानव हा कर्माच्या रहाटगाडग्यावरील लोटचा असून तो विषयांच्या विहिरीतील सुखाने भरतो पण वर आल्यावर रिकामा होऊन त्यात दुःखाची हवा शिरते. कर्म चक्र सदैव चालू असल्यामुळे तो सुखदुःखात आळीपाळीने फिरत राहतो व त्याच्या कर्माचे (नशीब) सुखदुःख, पाप-पुण्य चुकत नाही. सगळंच मुसळ केरात गेलं की हो. झालं काय ? एवढा विचार केला व शेवटी जेथून निघालो तेथेच (पापपुण्य) आलो. विश्व आहे तोपर्यंत हे रहाटगाडगे चालूच राहणार. तुम्ही म्हणता ऋताला रुचेल अशी कृति केली तरी या रहाट गाडग्यातून सुटका नाही. मग सुखदुःखाच्या जबड्यातून सुटका होणार कशी ? होईल. सुटकेचा सरळ मार्ग आहे. चक्रावरील लोटचा चक्रापासून बाजूला झाला तर तो भरणारही नाही व रिकामाही होणार नाही. चक्रापासून आपण बाजूला झालो, अलिप्त राहिलो तर मग आपले पाय चक्रात कसे अडकतील? जत्रेतील पाळण्याच्या चक्रापासून बाजूला राहून आपण पहात राहिलो तर काय आपण त्या चक्रावर गरगरा फिरू? तसेच हे. पण हे व्हावे कसे? अलिप्त रहावे कसे? कृष्णाला विचारा. एकनाथी भागवतात त्या सख्याने सगळं काही सोप करून सांगून ठेवले आहे. चांगले, वाईट, पापपुण्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे मागं म्हटलं आहे. नाणेच नाहीसे झाले म्हणजे दोन बाजू राहिल्या कुठे व येणारी सुखदुःखे असणार कशी. हे नाणे म्हणजे अहंकार. मी करतो ही भावना. मी च्या सर्व विभक्त्या (मी, माझे, मला वगैरे). विभक्तीतील विचार म्हणजे अहंकारी गेला की भक्ती राहील व तीच आपणास कर्मचक्रातून बाहेर काढील. अहंकार नाहीसा झाला तर जगाची कार्ये थंडावतील, आली पुन्हा पंचाईत. अहंकार सोडून कर्म करावे पण अहंकार सुटणे हे जगधारणेस पोषक नाही, कसा घालवायचा याचा मेळ ? अहंकार ही भावना मानवाला कार्यप्रवीण करणारी आहे. तिचा लोप होऊच शकणार नाही. अहंकारांतील कर्तेपणाचा लोप झाला पाहिजे. मी करतो ही भावना लोपली पाहिजे. भर्जित बी क्षुधाशामक असते पण ते जमिनीत पेरले तर त्याला नवीन अंकूर येत नाहीत वा नवीन नवीन बीजे निर्माण होत नाही. तद्वत् भर्जित अहंकार व्यवहारात वावरला तरी त्याला अहंकर्तृत्वाचे नवीन अंकूर फुटत नाहीत की नवीन कर्म बीजे निर्माण होत नाहीत. हे

व्हावे कसे? नामाच्या तव्यावर भक्तीच्या अग्नीने त्याला चांगला तापवला की तो भर्जित होऊन मी करतो ही भावना भाजून जळून जाईल. कर्तृत्व माझे नाही तर कोणती तरी अज्ञात शक्ति (ऋत, परमेश्वर) आपल्या योजनेप्रमाणे माझ्याकडून कार्य करवून घेत आहे. मी फक्त निमित्य आहे. व्यवहारात दिसायला कर्ता आहे. खरा कर्ता करविता तो परमेश्वर, ती विश्वशक्ति, ते ऋत आहे. अशा भावना मनात आणीत व नामस्मरणाचा-तवा तापवीत आपण आपली कर्तव्ये करीत राहिलो की हळू हळू अहंकारातील कर्म कर्तृत्वाचा नाश होईल. नामस्मरणाच्या प्रेशर कुकरमध्ये रज तम पार मऊ होऊन सत्वाचे सकस अन्न तयार होते, पण एवढ्याने सर्व भागायचे नाही. कर्तृत्वाची भावना नाहीशी झाली तरी फलाशा, माझ्या करण्यापासून मला अमुक फळ मिळावे ही भावना कायम राहील. फलाशेने केलेल्या कर्माला फळ हे येणारच व ते चांगले वाईट कसेही असले तरी दुःख काही आपली पाठ सोडणार नाही. म्हणून फलविरहीत कर्म करणे जरूर आहे. हे कसे होणार? फलापासून अलिप्त राहिल्याने. माणूस जे काही करतो ते अमुक फळ मिळावे या हेतूने. हेतूविरहीत कर्म असू शकत नाही. यास्तव या हेतूतील 'अमुकच फळ' हे बाद करायला पाहिजे. फलाची आसक्ती असू नये. तिचा त्याग केला पाहिजे. अमुकच फलाचा लोभ असता नये. मी ऋताचा पाईक आहे. त्या ऋतास, त्याच्या नियमानुसार जे फळ द्यावयाचे असेल ते देवो. मी चिंता करीत नाही. फळ देणारा तो. अशा भावनेने कर्म करणे म्हणजे अनासक्तीने कर्म करणे होय. अशा कर्माच्या फलाचे आपण मालक नसतो. जेलमध्ये फाशी देण्याचे काम करणारा माणूस जेव्हा एकाद्याला फाशी देतो तेव्हा त्याने खून केला असं काही सरकार समजत नाही. की त्याला शिक्षा करीत नाही. कारण तो हुकुमाचा ताबेदार असतो. यास्तव त्याने केलेल्या कर्माचे फळ त्याला बाधक होत नाही. मी फक्त ताबेदार माझ्या सरकारचा, ही भावना असली तर तो कर्म फलाचा धनी होत नाही. त्याचा लोटद्या चक्रातून वेगळा झाला व तो सुखदुःखातीत झाला, कृष्ण माझं सरकार, मी सेवक, काम करणे हे माझे काम, मोबदला फळ धनी साहेब देणारा धन्याचं काम करून त्याच्या चरणी ठेवलं, अशी अलिप्तता राखणे म्हणजे आपली कर्मे कृष्णार्पण करणे होय. आपल्या कर्मकर्तृत्वाचा असा नैवेद्य देवाला दाखवावा व गप्प बसावे. आता करतोय अशी शाब्दिक बडबड करू नये. अंतःकरणाची खरी उकळी पाहिजे अशा प्रकारे अकर्त्या भावनेने, निष्काम वृत्तीने आपली कर्मे कृष्णार्पण केल्याने ब्रह्मगाठ पाहून भुतेखेते जशी पळून जातात तशी आपली ही कृष्णगाठ पाहून सुखदुःखे पळून जातील. पटलं बुवा, पण एकंदर सगळं काम कठीणच दिसतय. नाही, कठीण नाही. आपला प्रेशर कुकर चांगल्या कंपनीचा (सद्गुरुकडून आलेला) असला म्हणजे झाले. भक्तीची आच लावण्याचे आपले काम, पुढे कुकर सगळं काही हळूहळू करील. कोणतेही कर्म कर्ता-करविता ईश्वर, मी फक्त निमित्य, अमुकच फलाशेचा त्याग या त्रयीचा संच झाल्यास आपले जीवन खऱ्या अर्थाने सुखी होईल. थोडक्यात संत दासगणूंच्या स्तवन मंजरीच्या सांगण्यात थोडा बदल करून—

पाप आणि पुण्य। ही दोन्हीही अज्ञान जन्य।
दोहीपासून अलिप्त आपण। असावे कमलापरी॥

❀

# श्रीसाईनाथ

## श्रीसद्‌गुरु साईमहाराज चरित्र

## लेखक: र. श्री. पुजारी, एम. ए. (पुणे)

१७. नऊ महिन्यांच्या लंघनाची ही वैद्यकीय योजना तर नव्हे:

नित्याच्या परिपाठाप्रमाणे माधवरावांनी घरातील देवांची पूजा आटोपली. पोथी वाचली. ताम्हनातील तीर्थ प्राशन करून ते डोळ्याला लावले. मग ताम्हन नीट उचलून, एक एक पाऊल सावकाशपणे टाकीत ते दारच्या तुळशीवृंदावनाकडे निघाले.

तुळसीत तीर्थ टाकून, पाठमोरे होऊन त्यानी दारात पाऊल टाकले मात्र, त्यांच्या कानावर कोणा वृद्ध माणसाची हाक आली.

माधवराव तेथल्या तेथेच थांबले. त्यानी वळून मागे पाहिले. एक वृद्ध मुसलमान गृहस्थ त्यांचेकडेच येत होता.

काळा कुळकुळीत वर्ण. पांढरी शुभ्र दाढी. दंतविहीन मुख. चालताना लटपटणारी देहयष्टी.

'भाईजी ! भाईजी !' अशी हाक घालीत तो मनुष्य अंगणातून दारापर्यंत आला होता. एका फार तातडीच्या कामासाठी तो माधवरावांना भेटणार होता. ती भेट काही कारणाने हुकली तर त्याचे जन्माचे नुकसान होणार होते. कदाचित तो माणसात आणि या जगातसुद्धा राहाणार नव्हता !

त्या माणसाचा तो उदास चेहरा, गलितगात्र देह पाहून माधवरावांचे मन कळवळले. मनाशी ते म्हणाले : अरेरे ! काय ही या म्हाताऱ्याची अवस्था ! डोळ्यानी नीट दिसत नाही. पायानी धड चालवत नाही. तरी हा म्हातारा या एवढ्या उन्हाच्या वेळी माझ्याकडे आला. काय असेल बरे या म्हाताऱ्याच्या मनाची व्यथा ? कोणत्या दुःखामुळे माझ्याकडे आला असेल बरे हा दुःखी जीव ? समर्थांच्या घरच्या श्वानाला सर्वजण मान देतात तसा मी एक. केवळ बाबांमुळे महत्त्व आलेला, मी एक साधा शाळामास्तर...

सोवळ्यात असूनही लगबगीने पुढे होऊन माधवरावांनी त्या वृद्धाचा हात धरला. आधार देऊन ते त्याला घरात घेऊन आले. त्याला नीट बसवून, त्याच्या जेवणाखाण्याची व्यवस्था केली. मग त्याचे मन पूर्णपणे शांत झाल्यानंतर त्याच्याशी बोलू लागले. अतिहळुवार चित्ताने त्याची विचारपूस करू लागले.

तो वृद्ध बोलता होऊन हळूहळू आपली हकिगत सांगू लागला.

म्हणाला, "भाईजी! काय सांगू? आज नऊ महिने झाले, या शिरडी गावात येऊन मी खिचपत पडलो आहे. धड जगवत नाही, धड मरवत नाही."

"हजारो माणसे येथे रोज येतात. बाबांचे मनसोक्त दर्शन घेतात. त्यांच्या पायावर

डोके ठेवतात. त्यांच्या हाताने उदी-प्रसाद घेतात. त्यांच्या मुखाने आशीर्वाद घेतात. मी मात्र एकटाच असा उरलो की ज्याला यातील काहीच मिळाले नाही. मिळेल असे वाटत नाही."

"रोज सकाळी उठून बाबांच्या दारी जाऊन मी उभा राहातो. डोळ्यात पाणी आणून प्रार्थना करतो: परवरदिगार! रहमदिल बाबा! मुझपर एकबार मेहेरनजर करना, मैं यहाँसे चला जाऊँगा! तकलीफ देनेकेवास्ते फिर कभी नही आऊँगा! मैं और कुछ माँगता नही! एक अपनी रहमनजर ...."

त्या वृद्धाच्या खोल गेलेल्या डोळ्यातून आसवे वाहू लागली. ओठांना कंप सुटला. तो पुन्हा सांगू लागला—

"भाईजी! मशिदीची पायरी चढण्याचे माझे भाग्य नाही. मी त्याबद्दल काहीही म्हणत नाही मनाला दुःख होते ते एकाच गोष्टीचे. मला पाहून बाबा तोंड फिरवतात. निघून जातात.

"बाबा भिक्षेला निघाले की मी पुढे होतो. धुळीत लोटांगण घेतो. पण ते माझ्याकडे पाहातही नाहीत.

"मग रडत रडत मी माझ्या ठिकाणी परत येतो. विचार करू लागतो: माझे तोंड-सुद्धा बाबांना नकोसे व्हावे असा गुनाह मी काय केला? समजू लागले तेव्हापासून तर धर्माच्या आज्ञेनुसार वागतो. दिवसातून सहा वेळा नमाज पढतो. नित्यनेमाने कुराण वाचतो. धर्माच्या आज्ञेनुसार मक्का-मदिना या पवित्र तीर्थक्षेत्रांच्या यात्राही करून झाल्या. दानधर्मही मी पुष्कळ केला.

माधवरावांच्या मनात विचार आला: हा कर्मठ मुसलमानही आपल्या कर्मठ ब्राह्मणाप्रमाणेच अंध दिसतो. नाही निर्मळ जीवन ! काय करील साबण?

चित्तशुद्धीसाठी तर पूजा-जपजाप्य-उपास इत्यादी सर्व. जन्मभर पंढरीची वारी करून एकाद्याच्या वृत्तीत काहीच बदल घडला नाही तर ती वारी कसली आणि तो उपास तरी कसला?

हातून घडलेल्या पापामुळे पश्चाताप होऊन रडत रडत केलेली यात्रा, हीच खरी तीर्थयात्रा. देहधारणेपुरताच आहार घेऊन देवाच्या पायाशी अखंड धरणे धरून 'मला तू निर्मळ कर' अशी प्रार्थना करणे म्हणजे उपवास. वाया चाललेला प्रत्येक श्वास ईश्वरा-च्या नामाचरणी गुंतविणे म्हणजे जप. काया-वाचा-मन करून देवाला प्रत्येक क्षणी आळविणे, त्याच्या करुणेची याचना करणे म्हणजे कीर्तन-भजन-निरूपण.

भांडे स्वच्छ झाले नाही तर ते घासणाऱ्या व्यक्तीच्या श्रमांचा उपयोग काय? चित्तशुद्धी होऊन अखंड मनःशांती प्राप्त झाली नाही तर जप-तप-यज्ञ-दान यांचा उपयोग कोणता?

बाबांच्या सहवासात घालविलेल्या क्षणांची आठवण माधवरावांना यावेळी तीव्र-तेने येऊ लागली. स्वतःशी ते म्हणाले: बाबा हे तसे अक्षरशत्रु शालेय विद्येचा किंवा अध्ययनाचा त्यांना गंधही नाही. भाषाही व्याकरणदृष्टया अशुद्ध खेडवळ. पण वाणीत

श्रोत्यांना गुंगवून टाकण्याचे सामर्थ्य एवढे की मी मी म्हणणाऱ्या पंडितानीही माथा नमवावा!

पाण्यातील माश्याला पाण्याखालच्या एकूण एक गोष्टी माहित असाव्यात त्या-प्रमाणे बाबांना जगातील अमुक एक गोष्ट माहीत नाही असे कधीच व्हावयाचे नाही.

तेल्याघरचा घाणा, कुंभाराघरची मडकी, चांभाराघरच्या वहाणा, ब्राह्मणाघरचे कर्मकांड सर्व त्याना माहित. जहांबाज सासू, चोरून खाणारी सून, लोभी भटजी, चिक्कू सावकार—या सर्वांची इंगिते त्यांना माहित.

बाबांच्या मार्मिक गोष्टी ऐकून हसून हसून त्यावेळी आमच्या मुरकुंडचा वळत. घरी येईपर्यंत मन अंतर्मुख होऊन त्या गोष्टींवर विचार करू लागे. कालांतराने कळे की बाबानी आम्हांसाठी तयार केलेले हे सर्व गुणाकरी काढे आहेत! रामबाण मात्रा आहेत!

माझ्यासमोर बसलेला कल्याणचा हा वृद्ध मुसलमान सिदिकी फाळके म्हणजे अशा प्रकारचा तर कोणी रुग्ण नाही! आपण दिलेले कडू काडेचिराईत त्याला योग्यपणे लागू पडावे म्हणून नऊ महिन्यांच्या दीर्घ लंघनाची वैद्यकीय योजना तर बाबांनी त्याच्या-बाबतीत उपयोगात आणली नाही!

शंभर कोसावरील माणसाचे मनोगत येथे मशिदीत बसल्या बसल्या ओळखणारे आणि तो येथे येताच त्याला तशी खूण देणारे बाबा काय या म्हाताऱ्या मनुष्याचे दुःखी मन जाणणार नाहीत! जरूर जाणतील. जाणत असतीलही.

माधवरावाना विचारात गढलेले पाहून तो म्हातारा मनुष्य अधिकच सचिंत झाला. दोन्ही हात जोडून म्हणाला, "माधवरावजी! मी आपले पाय धरतो. आपण सांगाल ते करतो. पण मला दूर लोटू नका. माझ्यासाठी बाबांकडे आपले वजन खर्च करा. त्यांना सांगा की मला एक क्षणभर तरी मशिदीत पाऊल ठेवू द्या. आपल्या पायावर डोके ठेवू द्या .आपल्या जवळ किंवा दूर का होईना एक क्षणभर बसू द्या. तेवढे झाले की मी आनंदाने जाईन. पुन्हा परत येणार नाही. त्रास देणार नाही."

व्यवहारातील धक्केचपाटे खाऊन निबर झालेले माधवरावांचे मन पुन्हा कळवळले. भावनाविवश झाल्याप्रमाणे त्या वृद्धाला ते म्हणाले, "चाचाजी! तुम्ही काही काळजी करू नका. मी काढतो बाबांकडे तुमचा विषय. फार तर काय करतील? माझ्यावर रागावतील. मला शिव्या देतील. परंतु संताच्या शिव्याही कल्याणकारी असतात.

"त्यातून आपण त्यांच्याकडे दुसरे काय मागत आहो? कृपेशिवाय दुसरे काहीही आपण मागत नाही. शरणागताला पदरी घ्या एवढेच आपले मागणे. तर आता तुम्ही काळजीच सोडा. बाबांची मनोमन प्रार्थना चालू ठेवा. म्हणा: माझे अनंत अपराध पोटी घालून आपण मला जवळ घेणार नाही तर मी कोणाकडे जाऊ? एका तुम्हाविना या जगात मला आता कोणीही नाही."

माधवरावांच्या घरून परत जाताना सिदिकी फाळके यांच्या मनाचा खचलेपणा कोठे पार पळाला. एखाद्या उत्साही तरुणाप्रमाणे झपाझप पावले टाकीत ते आपल्या

निवासस्थानाकडे निघाले. मनाशी म्हणाले: डोक्यावरील ओझे आता खांद्यावर आले. हो म्हटले की माधवराव काम करणारच. मग त्यांच्यावर बाबांचा कितीही राग होवो.

## *(१८)आकार घेण्यास तो आता लोण्यासारखा मऊ झाला आहे.

दुसरे दिवशी सकाळी लवकरच उठून माधवराव त्या जुन्या चावडीसमोर जाऊन उभे राहिले. चावडीतील त्या वृद्ध हाजीला म्हणाले, "चाचाजी! अभी चलो. मसजिद जाएँगे. मैं माधवराव आया हूँ।"

तो म्हातारा लगबगीने उठला. आनंदाने भारावून म्हणाला, "कौन? माधवरावजी? तुम आये? अल्ला तुम्हारा भला करेगा। चलो! अभी जायेंगे"

त्या म्हाताऱ्याचा उत्साह, आनंद, उतावीळ, भक्ती पाहून माधवराव मनातल्या मनात बाबांना म्हणाले: बाबा! चिखल तुडवावा लागतो, मगच तो कुंभाराच्या चक्रावर जातो हे खरे. पण या गरिबाला अजून किती तुडविणार? आता याला चक्रावर घ्या आणि तुमच्या हातानी हवा तो आकार द्या. आकार घेण्यास तो आता लोण्यासारखा मऊ झाला आहे.

मशीद जवळ येताच माधवराव त्या म्हाताऱ्याला म्हणाले, "चाचाजी! तुम्ही अंमळ या भिंतीशी थांबा. मी आत जातो. बाबांशी बोलतो. मग तुम्हाला आत बोलावतो"

एखाद्या आज्ञाधारक, शहाण्या मुलाने मान डोलवावी तशी त्या वृद्धाने मान डोलविली.

मग मशिदीत जाऊन माधवरावांनी बाबांच्या चरणी मस्तक ठेवले. हात जोडून बाबांच्या समोर एका बाजूस बसले. डोळे किंचित मिटले. जणू माधवराव म्हणजे शंकरासमोरचा विनम्र, आज्ञाधारक नंदी!

एक दोन क्षण शांततेत गेल्यानंतर माधवरावांनी मान वर केली. बाबांची एकंदर मन:स्थिती, रागरंग ओळखला. अति कोमल, हळुवार आवाजात दोन्ही हात जोडून बोलण्यास सुरुवात केली—

"देवा! चावडीतील तो म्हातारा हाजी मक्का-मदीना करून आपल्या दर्शनासाठी येथे आला आहे. आज नऊ महिने झाले, तळमळतो आहे. त्याच्यावर दया करा. मशिदीत येऊन त्याला एकवार दर्शन घेऊ द्या.

"असंख्य लोक येथे येतात. त्यांना आपण दर्शन देता. हाच एक बिचारा मात्र खिचपत पडला आहे."

बाबांच्या शांत चेहऱ्यावर रागाची एक दीप्ती एका क्षणात झळकून गेली.

भिवया उंचावून, एखादा तीव्र प्रश्न करावा तसे बाबा बोलले, "बिचारा? तो-हाजी आणि बिचारा? शाम्या! शुद्धीवर आहेस काय तू? अजून तुझ्या ओठाचा जारसुद्धा वाळला नाही, आणि मला शहाणपण शिकवतोस?"

त्या हाजीचा राग या परम भक्त शामरावावर विनाकारण निवतो आहे असे वाटून की काय शामरावांची समजूत घालण्यासाठी हलक्या आवाजात बाबा पुन्हा बोलले–

"अरे! अल्लाची खुदरत त्याच्यावर नाही त्याला मी काय करू? अल्ला ज्याच्या रिणकरी, तोच या मशिदीची पायरी चढणार! येथील तो फकीर त्यालाच पावणार! त्या हाजीला येथे ये किंवा नको म्हणणारा मी कोण?"

बाबांच्या या उत्तरावर शामराव काय बोलणार? ते स्वस्थ बसून राहिले. त्या हाजीचा केविलवाणा चेहरा पुन्हा त्यांच्या डोळ्यासमोर आला. हाजीची बाजू कशी मांडावी हेही त्याना सुचेना.

एवढ्यात बाबा पुन्हा बोलले, "हे बघ, त्या बारवी विहीरीच्या कडेकडेने एक लहानशी पाउलवाट जाते. त्या म्हाताऱ्याकडे जा आणि त्याला विचार की म्हणावे त्या पाउलवाटेने जाऊन तू परत येशील काय?"

माधवराव बाबांजवळून उठले. त्या म्हाताऱ्याला बाबांचा प्रश्न जसाच्या तसा सांगितला.

आनंदाने मान डोलवून तो हाजी म्हणाला, "असेना का ती वाट कशीही, कितीही अवघड, धोक्याची; मी त्या वाटेने जाऊन येईन. जरूर जाऊन येईन. पण बाबांच्या चरणाजवळ मला क्षणभर का होईना, स्थान मिळावे. मनसोक्त दर्शन घडावे."

शामराव थेट बाबांकडे गेले. त्या हाजीचे शद्ब जसेच्या तसे त्यांच्या कानावर घातले.

ते ऐकून घेऊन ,मान डोलवून बाबा शामरावाना पुन्हा म्हणाले. "जा आणि त्याला विचार, म्हणावे: प्रत्येक खेपेस दहा दहा हजार करून, चार हप्त्यात तू मला चाळीस हजार रुपये देशील काय?"

माधवरावानी आणलेला निरोप ऐकून तो हाजी खूष होऊन म्हणाला, "हे काय विचारणे? चाळीस हजारच का, चाळीस लाखसुद्धा मी बाबांच्या चरणी केव्हाही अर्पण करीन".

हाजीचा हाही मनोदय माधवरावानी जाऊन बाबांना जसाचा तसा सांगितला.

तो ऐकून घेऊन बाबा म्हणाले, "जा आणि त्याला विचार. म्हणावे: आज आम्ही मशिदीत बोकड कापणार आहोत. जंगी मेजवानी आहे. तर तुला त्या बोकडाचे साधे घोस पाहिजे, का हाडासह तुवर पाहिजे का त्याचे वृषण पाहिजे. जा. काय पाहिजे, ते त्याला विचारून ये."

माधवरावानी पुन्हा जाऊन बाबांचा निरोप हाजीला जसाचा तसा सांगितला.

तो ऐकून हाजी म्हणाला, "माधवरावजी मला त्यातील काहीही नको. बाबांच्या नेहमीच्या जेवणाच्या त्या फुटक्या कोळंब्यातील म्हणजे मातीच्या त्या कवलातील शिळ्या भाकरीचा एक तुकडा मला मिळाला तरी मला तो त्या मेजवानीपेक्षा जास्त आहे".

हाजीचा हा निरोप ऐकून भरती आलेल्या समुद्राप्रमाणे बाबा खवळले. क्षोभाच्या गगनभेदी लाटांचे तांडवनृत्य जणू सुरू झाले.

त्या क्षोभाच्या भरात मातीचा तो कोळंबा उचलून बाबानी मशिदीबाहेर भिरकावून दिला. पाण्याने भरलेल्या मातीच्या घागरीचीही गत तीच झाली. मग मशिदीच्या पायऱ्या उतरून, खापऱ्यांचा खच तुडवीत, दात ओठ खावून आपलेच मनगट कराकरा चावीत भिंतीशेजारी उभा असलेल्या त्या हाजीच्या समोर जाऊन बाबा उभे राहिले. अंगावरील कफनी दोन्ही हातानी त्याच्यासमोर वर करून रागारागाने म्हणाले, "तू स्वतःला समजतोस तरी कोण? माझ्याकडे एवढी फुशारकी मारतोस ती कशाच्या जोरावर? तुझ्या बुड्ढेपणाच्या? हातभर लांब दाढीच्या? "अरे, जन्मभर तू कुराण वाचलेस त्यातून शिकलास तरी काय? मक्केची यात्रा केली म्हणून सर्वांना सांगतोस. यात्रा केलीस पण मिळविलेस काय? पदरात काय पडले? काही नाही! रिकामी पायपीट मात्र केलीस. वर अहंकाराचे ओझे डोक्यावर जन्मभर वागविलेस! ओझी वाहाणाऱ्या गाढवासारखे!

"अरे! ज्याने मला कधीही न ओळखता जन्मभर पुराणाचे किंवा कुराणाचे ओझेच वागविले अशा बेवकूफ माणसाला मी गधा म्हणू नको तर दुसरे काय म्हणू!"

बाबांचे हे वाक्ताडन ऐकून तो म्हातारा अगदी गांगरून गेला. भयभीत झाला. हात जोडून थरथर कापत भिंतीशी तसाच उभा राहिला.

हे पाहून बाबा तेथून माघारा वळले. क्षोभाच्या त्याच आवेशात मशिदीच्या अंगणात शिरले.

मशिदीच्या अंगणात पाऊल पडताच तेथे काही माळणी दिसल्या. त्यांच्याकडे जाऊन बाबांनी त्यांच्या आंब्यांच्या सर्व पाट्या खरेदी केल्या. म्हणाले, "थोड्या वेळाने त्या पलिकडच्या चावडीत जा आणि तेथे एक म्हातारा इसम बसतो त्याला हे सर्व आंबे माझी भेट म्हणून द्या."

. एवढेही कमी वाटले म्हणून की काय, बाबा पुन्हा वळले. कफनीच्या खिशात हात घालून पंचावन्न रुपये बाहेर काढले. ते सर्व त्या हाजीच्या हातावर मोजून म्हणाले, "आता येथे थांबू नको. तुझ्या चावडीत जा. मी बोलावीन तेव्हा पुन्हा इकडे ये."

ते आंबे आणि ते रुपये हा बाबांचा प्रसाद समजून हाजी चावडीकडे परत गेला. माधवरावाकडे जाऊन म्हणाला, "बाबांची माझ्यावर कृपा झाली. चुकलेल्या मुलाला शिक्षा करून वडिलानी पुन्हा पदरात घ्यावे तसे बाबांनी मला पदरात घेतले. आता मी निश्चित झालो. पूर्ण सुखी झालो. माधवरावजी! माझ्या या भाग्याचे सर्व श्रेय तुम्हांसच आहे."

### १९ भाईजी, मेरे बुड्ढेके आँखे आज पूरे खोल गये

वळिवाचा पाऊस आणि बापाचा राग–दोन्हीही सारखेच. वळिवाचा पाऊस केव्हा, कोठे झोडपेल नेम नाही. बापाचा राग केव्हा, कोणत्या कारणाने उफाळेल सांगता

येणार नाही. एक गोष्ट मात्र परिणामी सत्य–दोन्हींचा अवतार केवळ कल्याणासाठीच.

आपल्या जेवणाचा मातीचा तो कोळंबा आणि पाण्याने भरलेल्या मातीच्या घागरी बाबांनी रागारागाने उचलून अंगणात भिरकावून दिल्या त्या क्षणी कल्याणच्या त्या हाजीला वाटले की आपल्या आकांक्षांचा चक्काचूर झाला. पण त्याच्या भाग्योदयाचा नेमका क्षण तोच होता.

कारण दुसऱ्याच दिवशी बाबांनी निरोप पाठवून हाजीला मशिदीत आपल्या-समवेत भोजनाचे निमंत्रण केले. आपल्या जवळ त्याला बसवून घेतला. प्रेमाच्या नाना गोष्टी त्याच्याशी केल्या.

या सर्व गोष्टींमुळे भारावून जाऊन तो वृद्ध हाजी म्हाळसापतींच्या घरी गेला. घडलेल्या सर्व आश्चर्यकारक घटना त्याना सविस्तर निवेदन केल्या आणि म्हणाला, "भाईजी! गेल्या नऊ महिन्यात जी तपःश्चर्या घडली तिचे फळ मला बाबानी अशा रीतीने दिले. आता एकच इच्छा उरली. बाबांकडून गुरुपदेश, मंत्र असे काही मला मिळावे. ते मिळविण्यासाठी बाबांच्या चरणी हवे ते अर्पण करण्यास, वाटेल तितका देह-दंड सोसण्यास, प्राणांची सुद्धा किंमत मोजण्यास मी तयार आहे. आपण आणि माधव-रावजींनी याबाबतीत मला मार्गदर्शन करावे."

मशिदीत प्रवेश मिळाल्या क्षणापासून म्हातारा अगदी बदलून गेला होता. बाबांनी आपणास जवळ केले याचा एकीकडे आनंद होता, तर दुसरीकडे आपण किती पापी, अपराधी, दुर्जन, नराधम अशी खंत होती. रात्रंदिवस मनाला टोचणी होती. तिच्यातून मुक्त होण्यासाठी तर गुरुपदेशाचा, गुरुमंत्राचा मार्ग बुडत्याला आधार सापडावा त्याप्रमाणे त्याला दिसत होता.

म्हाळसापती एक क्षणभर स्वस्थ बसले.

गुरुमंत्र किंवा गुरुपदेश यासंबधीचे बाबांचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले.

तो सर्व प्रसंगच हाजींना सांगितल्यास बाबांचा आदेश हाजींच्या मनात पूर्णपणे उतरेल असे वाटल्यावरून ती हकिगत मुळापासून म्हाळसापती सांगू लागले. म्हणाले–

"चाचाजी, गोष्ट तशी जुनीच आहे. पण तिचे स्मरण दिवसातून दहादा तरी मला होते.

"घरातील सर्व वस्तूंचा विसर झाला तरी एक वेळ चालते. पण तिजोरीची किल्ली मात्र विसंबून भागत नाही. ती नित्य अंगावरील जानव्यासच घालून ठेवावी लागते.

"सद्गुरुंचा शब्दही असाच मोलाचा. तो हृदयाशी बाळगला आणि त्यानुसार आचरण केले की सद्गुरु संतोष पावतात.. हवे ते देतात. कारण तीच त्यांची खरी सेवा असते.

नानासाहेब चांदोरकर म्हणून बाबांचे एक निस्सीम भक्त. फिरतीची नोकरी असलेले ते एक सरकारी अधिकारी. त्यांच्यामुळे असेल किंवा दासगणूंच्या कीर्तनामुळे असेल, या गावाकडे बाहेरील भक्तांची मुंग्यांसारखी रांग लागली. अशा लोकांमधून संगमनेरच्या खाशाबा देशमुखांची वृद्ध आईही एक दिवस येथे येऊन पोचली.

अत्यंत पवित्र आचरण असलेली ती वृद्ध स्त्री. येथे येताच तिला बाबांच्या दर्शनामुळे अतिशय समाधान वाटले. श्रीमुख पाहून वारकऱ्याने वाटचालीचा शीणभागोटा विस-

रावा तसे तिला झाले. श्रीबाबांचे चरणी अत्यंत भक्ती जडली. घेईन तर गुरुमंत्र बाबांच्याकडूनच, असा मनाशी निर्धार केला. बाबांनी आपणास गुरुमंत्र द्यावा म्हणून अन्न-पाणी वर्ज्य करून उतरल्या घरी बसून राहिली.

असे एक नव्हे, दोन नव्हे तर तीन दिवस झाले.

आधीच वृद्ध झालेली ती स्त्री त्यात हे उपोषण तिसऱ्या दिवशी तिची प्रकृती अगदी तोळामासा झाली. बोलण्याचे त्राणसुद्धा अंगात उरले नाही.

हे पाहून आम्ही सर्वजण घाबरलो. माधवराव एवढे धीराचे, पण त्यांच्याही तोंडचे पाणी पळाले. तसेच धावत जाऊन मशिदीत बाबांच्या समोर बसले. म्हणाले, "बाबा! त्या म्हातारीकडे—संगमनेरच्या त्या राधाबाई देशमुखीणीकडे जरा लक्ष द्या ना! उपोषण करून ती येथे मेली तर लोक उद्या म्हणतील: म्हातारी मेली तरी बाबांनी तिकडे लक्ष-सुद्धा दिले नाही. असे कसे बाबांचे काळीज!"

माधवरावानी ह्या म्हातारीच्या प्रकृतीचे केलेले वर्णन ऐकून बाबाना काय वाटले कोण जाणे, ते लगेच उठले. माधवरावाना म्हणाले, "चल. आपण तिच्याकडे जाऊ. तिच्या वेडया मनाची समजूत काढण्याविना आता दुसरा उपायच नाही."

माधवरावांना बरोबर घेऊन ती देशमुखीण ज्या घरी उतरली होती त्या घरी बाबा गेले.. तिच्या समोर जाऊन बसले. तिची स्थिती बारकाईने क्षणभर अवलोकन करून अत्यंत प्रेमळपणे तिच्याशी बोलू लागले. म्हणाले—

"आई, असे का गे तू धरणे धरलेस? देवाने दिलेला एवढा मोलाचा देह सांभाळण्याचे सोडून त्याचा असा त्याग करण्यास का गे निघालीस? त्याचे असे हाल हाल का गे बाई मांडलेस? सांग. मला मनमोकळेपणी सांग.

"आई, तुकडे मागणारा मी एक यःकश्चित फकीर, आज तुझा मुलगा होऊन तुझ्यापुढे आलो आहे. तुझ्याकडे पदर पसरून एवढेच मागतो आहे की तुझ्या कल्याणाचे मी जे काही सांगतो, ते ऐक. लक्ष देऊन ऐक.

"आई, माझेही असेच एक गुरु होते. दयेच्या, कृपेच्या त्या साक्षात सागराविषयी मी काय बोलू? त्यांच्या कृपेच्या केवळ स्मरणानेही माझी वाणी मूक होते. डोळे वाहू लागतात. मग त्यांच्याविषयी काही बोलणे तर दूरच!

"आई, त्या माझ्या गुरुंची सेवा मी पुष्कळ केली. त्यानी मोठ्या प्रेमाने मजकडून करवून घेतली. पण मला गुरुमंत्र काही केल्या देईनात. त्याबद्दल तोंडून चकार शब्दही काढीनात.

"हे पाहून मीही हट्टास पेटलो. विचार केला: मंत्र घेईन तर याच एका गुरुंकडून. अन्यथा मंत्र घेणार नाही.

"माझा हा निग्रह पाहून एक दिवस त्यानी माझे मुंडन करविले. मग मला म्हणाले: मला दोन पैसे दे रे."

"मी मागत होतो गुरुमंत्र. कानमंत्र. आणि त्यानी माझ्याकडे मागितले दोन पैसे!

"नंतर ध्यानी आले की त्यातील एक पैसा म्हणजे 'निष्ठा' होती. दुसरा पैसा म्हणजे 'सबूरी' होती.

"सद्गुरुठायी अनन्य निष्ठा बाळग आणि धीर धर" हाच त्यांचा कोटी मोलाचा संदेश होता.

"मजजवळील दोन पैसे घेऊन त्याच्या मोबदल्यात जन्मोजन्मी पुरेल एवढी मोलाची शिदोरी जणू सद्गुरुंनी माझ्या पदरी बांधली. "आई, खरे तेच सांगतो, ज्याच्याजवळ निष्ठा आणि सबुरी, त्याला आयुष्याच्या वाळवंटातील दुःखातही कधी काही कमी पडत नाही, पडणार नाही.

"पण ही दोन्ही नाणी मात्र बावनकशी सोन्याची पाहिजेत. त्यात यत्किंचितही हीण असलेले सद्गुरुंना चालणार नाही.

बाबा क्षणभर थांबले.

"सद्गुरुंची कृपा आपल्यावर कोणत्या मार्गाने झाली ते सांगू लागले. म्हणाले–

"आई, माझ्या गुरुविषयी काय सांगू? त्यांचे वर्णन कोणत्या शद्बांनी करू? त्यांचे वर्णन करणे माझ्या वाणीपलिकडचे आहे.

"बारा वर्षे मी त्यांच्या घरी राहिलो. पुत्रवत त्यांनी माझे पालन केले. अन्न, वस्त्र, प्रेम कशाला म्हणून काही कमी केले नाही.

"त्यांचा शद्ब, स्पर्श, दर्शन, सहवास यांची गोडी तर काय वर्णू? ते ज्याला लाभले त्याच्यापरता भाग्यवान जगात दुसरा नाही.

"कासवी आपल्या पिलाचे पोषण केवळ आपल्या प्रेमदृष्टीने करते. तसे माझे सद्गुरु माझ्याकडे आपल्या अमृतदृष्टीने तासनतास पाहात. जणू ती दृष्टी मला न्हाऊमाखू घाली; खाऊ-पिऊ घाली; आपल्या प्रेमार्ततेची हरतऱ्हेची वस्त्रे-भूषणे मला मोठ्या कौतुकाने लेववी.

"आई, खरे ते तुला सांगतो, माझ्या सद्गुरुनी मला कधीही एखादा कानमंत्र किंवा गुरूपदेश दिला नाही. माझे कानही कधी फुंकले नाहीत. तरीही मला त्यांची कृपा लाभली जे हवे होते ते देऊन त्यानी माझे पूर्ण समाधान केले.

"म्हणून तुला सांगतो की गुरूमंत्राचा हा हट्ट सोडून दे. देहदंडाचे हे आत्मक्लेश टाकून दे. आणि कोणी तुझे सद्गुरु यांच्या ठायी चित्त अनन्य कर. त्यात सर्व काही आले."

म्हाळसापतींनी एवढी हकिगत सांगून डोळे क्षणभर मिटले.

मग डोळे उघडून सिदिक फाळके याना ते म्हणाले– "चाचाजी, बाबांनी जे सांगितले ते स्वानुभवाचे. त्याचे चिंतन, मनन, निदिध्यासन करण्याविना आपल्या हाती दुसरे काय आहे'?.

"नववधू आपल्या वल्लभाच्या चिंतनात अहोरात्र रमते. आकाशात उडणाऱ्या घारीचे चित्त आपल्या पिलाजवळ असते. धनलोभ्याचे सर्व लक्ष आपल्या पुंजीवर विसावते.

तीच उत्कटता, तीच तळमळ, तोच ध्यास ज्याला श्रीगुरुंच्या चरणी लागला, त्यालाच श्रीगुरु प्रसन्न झाले. जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी ज्याने श्रीगुरुना पाहिले त्यालाच ते रत्नाप्रमाणे लाभले. अन्यथा तो कानमंत्र, ती जपमाळ, ती पोथी, तो पूजापाठ काय कामाचा? प्राण नसलेल्या देहाइतकेच त्या सर्वांचे महत्व.."

म्हाळसापतींचे बोलणे ऐकून सिदिक फाळके यांच्या मनाचे पूर्ण समाधान झाले. म्हाळसापतींना नमस्कार करून आपल्या निवासस्थानाकडे ते गेले. जाता जाता म्हणाले, "भाईजी, मुझे बुड्ढेकी आँखे आज पूरी खुल गयी। अबसे मैं बाबाका बंदा हूँ।"

# जगी सर्व सुखी असा कोण आहे–

––लेखक : श्री. हे. घ. कुळकर्णी

जगी सर्व सुखी असा कोण आहें
विचारें मना तूची शोधूनि पाहें

श्रीसमर्थ रामदास स्वामींचा हा साधा आणि सोपा श्लोक, परंतु साऱ्या विश्वाला (चराचराला) विचार करावयास लावणारा आहे. परंतु त्याचा विचारच कधी कोणी करीत नाही. विश्वाची आजची स्थिती पाहिली म्हणजे ह्या साध्या, सोप्या श्लोकाचा अभ्यास करण्याची आज साऱ्या चराचराला नितांत गरज आहे. आजचा माणूस धडपडतो आहे सुखांसाठी-सुखी होण्यासाठी खरे-खोटे, पाप-पुण्य यांचं गाठोडं त्याने बाजूला खुंटीवर टांगून ठेवलेले आहे. त्याची त्याला गरजच वाटत नाही. सुखाच्या भ्रामक कल्पनेने तो वणवण भटकतो आहे-सुखाच्या शोधार्थ. परंतु ते मृगजळ आहे याची त्याला जाणिवच नाही. आयुष्यात काही तरी केले पाहिजे अशी त्याची मनोधारणा आहे. परंतु नक्की काय केले पाहिजे याचे स्मरण त्याला नाही. त्यामुळे तो ह्या मृगजळामागे धावतो आहे–खूप जोरात–नंतर तो थकतो-खूप थकतो व हताश होतो. पण केव्हा–? तोपर्यंत खूपच काळ निघून गेलेला असतो. ज्याच्यासाठी त्याने आयुष्याचा अमोल असा काळ व्यर्थ घालविला.

वरील समर्थांचा प्रश्न आपण आपल्या मनाला शांतचित्ताने विचारला तर आपलंच मन आपल्याला उत्तर देईल "की हे माणसा, जगात कोण सुखी आहे सांग? नाही. कोणालाही ह्या जगात तू समजतोस तसे सुख मिळालेले नाही. ज्यांना तू सुखी समजतोस ते देखील अनेक व्याधींनी त्रस्त झालेले तुला आढळून येतील. परंतु त्यासाठी त्यांच्या खाजगी जीवनाचा अभ्यास तुला करावा लागेल. दुरून डोंगर साजरे या प्रमाणे ते दिसते आहे."

श्री समर्थ म्हणतात–

**सुख सुख म्हणतां हे दुःख ठाकूनि आलें**
**भजन सकळ गेले चित्त दुश्चीत झाले**
**भ्रमित मन कळेना हीत तें आकळेना**
**परम कठिण देही देहबुद्धी वळेना**

–ज्या सुखासाठी आपण धडपडलो, मरमर मेलो, परंतु खरेखुरे सुख आपल्या पदरात न पडता केवळ आपल्या वाटचाला दुःखच आलेले दिसले. ज्यामुळे चित्त अशांत होऊन नामस्मरण कधीच घडले नाहीं. मनाला भ्रांत पडली. खऱ्या सुखाची ओळख करता आली नाही. ह्या देहाच्या स्वार्थाने–देहरक्षणाच्या हेतूने सुबुद्धीच आठवली नाही.

माणसाच्या सुखाच्या कल्पना अनेक आहेत. ह्यात सुखाचे खालील प्रमाणे गुणानुसार तीन प्रकार आहेत.

(१) **सात्विक सुख**:– ज्यायोगे माणूस परोपकारी जीवन जगतो असे सुख. दुसऱ्यासाठी सतत झटून मग आपला विचार करणारा. सर्वांची चिंता वाहणारा. हे सुख ज्याच्या वाटयाला आले तो महा भाग्यवान म्हटला पाहिजे. कारण तो जगताच्या सुखासाठी आपले आयुष्य घालवून आपल्या स्वार्थसुखाची होळी करतो. सर्वांना सम पाहतो व एकनिष्ठ भक्तीने अखंड भगवंताची भक्ति करतो. ह्या सुखाला उपमाच नाही. ह्यात माणूस अमृतमय जीवन जगतो व सत्य सुखाचा अनुभव घेत असतो.

(२) **राजस सुख**- ज्यायोगे माणूस आपल्याच स्वार्थसुखाचा विचार करतो. स्वत:साठी धडपडतो. जसे वर सांगितलेच आहे. दुसऱ्याची थोडी देखील पर्वा करीत नाही. घरदार-बायका-मुले साधनसंपत्ती यांचा उपभोग घेण्यासाठीच आपले जीवन आहे असे तो मानतो व कटू-स्वार्थसुखाचा (पण त्याच्या मनाला) गोड अनुभव घेत असतो.

(३) **तामस सुख**- खरं म्हणजे तामसाला सुख म्हणणंच चूक आहे, परंतु आपण ते मानतो. काम-क्रोध-लोभ-मद-मत्सर ह्या पांच पंचासहित ते वाटयाला येते व अति वेगाने नाशाकडे ओढून नेते. ज्यायोगे माणूस अति स्वार्थबुद्धीने पछाडला जाऊन दुसऱ्याचा नाश करण्याचा प्रयत्न करतो. स्वार्थासाठी-गोर-गरीबाना पिळणारा हा ह्या तामस सुखाचा जहरी (पण त्याच्या मनाला गोड) असा अनुभव घेत असतो.

ह्या तीनही सुखात वरील सात्विक सुख सर्वश्रेष्ठ असून माणसाने ते मिळविण्याची सतत धडपड केली पाहिजे. इतरची ही दोन सुखे फसवी असून ती मानवाला जाळ्यात अडकविणारी व घोर अशा अंध:काराकडे नेणारी आहेत. त्यापासून सावध राहण्याचे प्रयत्न सतत केले पाहिजेत.

म्हणून समर्थ खऱ्या सुखांसाठी भगवंताजवळ मागतात–

**नको द्रव्यदारा, नको येरझारा**
**नको मानसीं, ज्ञानगर्वे फुगारा**
**सगूणीं मना लाविरे भक्तिपंथा**
**रघूनायका मागणे हेंचि आतां**

–ज्यात आहे-प्रेम–मानवता–निस्वार्थीपणा आणि मनाची स्थिरता.

ज्यात आहे कल्याण–मानवाचं आणि अखिल मानव जातीचं!

भक्तिमार्ग हाच खऱ्या सुखाचा एकमेव मार्ग आहे. ज्यायोगे मानव आपल्या स्व:ताला सांभाळून ही विश्वाची विश्वनौका पैलतिराला सुखरूपपणे लावण्याचे महत्कार्य करू शकेल, आणि मग त्याच्या वाटयाला येईल ते सुख–अक्षय सुख–ज्याचा अंत कदापी होणार नाही.

–जय जय रघुविर समर्थ–

# श्री. गोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन

पु. म. अत्रे

### गोरक्षण

कसायाला विकल्या जाणाऱ्या गाई कसायापेक्षा सढळ किंमत देऊन महाराज घेत व गोंदवल्यास आणून स्वतः त्यांची सेवा करीत. गाईच्या सान्निध्यात आरोग्य लाभते म्हणून ते आजाऱ्यांना कसोशीने गोसेवा करावयास लावीत.

**गंगे, गोदे, यमुने, या ग या!**

एकदा महाराज कसायांना म्हणाले, "मी तुमच्या गायी विकत घेतो. तुम्हीही हा धंदा करू नका. या जीवांना किती कष्ट होतात याची तुम्हाला कल्पना नाही!" कसाई म्हणाले, "गायींना काय समजते!" श्रीमहाराज बोलले, "तुम्ही त्यांना मोकळ्या सोडा. मी लांब उभा राहून त्यांना हाक मारतो. त्या माझ्याकडे धावत आल्या तर तुम्ही सोडा." कसाई म्हणाले, "हे कबूल. पण जर त्या तुमच्याकडे आल्या नाही तर आम्ही त्या मारायला नेऊ, तुम्हाला विकणार नाही!" श्रीमहाराज दोनशे कदमावरून मोठ्याने म्हणाले, "गंगे, गोदे, यमुने, या ग या! या दीन दासाजवळ या!" लगेच सगळ्या गाई शेपट्या वर करून चौखूर धावत आल्या व त्यांच्या तोंडाकडे ओळखीने पहात हुंबरू लागल्या. श्रीमहाराज भगवान् गोपालासारखे त्यांच्यामध्ये दिसत होते.

**श्रीमहाराज म्हणजे दिव्य प्रेमः**

श्रीमहाराज जनतेचे जनार्दन तर होतेच पण त्यांचा बताशा, लंगडी गंगी, गोशाळेतील गायी-वासरे, एकादशी करणारा त्यांचा कुत्रा, त्यांच्या पश्चात् चारापाणी सोडलेला खोडगुणी बैल अशा मूके प्राण्यांचेही त्यांच्यावर अलोट प्रेम होते. हे पाहून श्रीमहाराज म्हणजे दिव्य प्रेम असे कोणाला वाटणार नाही?

**पाप ही आगच असतेः**

औंधच्या राजघराण्यातील एक स्त्री श्रीमहाराजांचे दर्शनाला आली. श्रीमहाराजाना पाहून ती मोठ्याने रडू लागली आणि काळीज पिळवटून त्यांना सांगू लागली, "महाराज आजपर्यंत मी घोर पातके केली आहेत. पण त्यातून मुक्त व्हावे म्हणून मी रामनामाचा जप करू लागले की सर्व पापकृत्ये माझ्या डोळ्यासमोर भुतासारखी नाचू लागतात. याला काही उपाय आहे का? श्रीमहाराज म्हणाले, "होय, खात्रीने याला उपाय आहे. पण पुढे वाटेल त्या प्रसंगात मी पाप करणार नाही असे मला वचन देत असाल तर मी तुमची पापे माझ्यावर घेतो. आहे का तयारी?" त्या स्त्रीने अनन्यगतिक होऊन, "मी पुन्हा कोणतेही पाप करणार नाही" असे श्रीमहाराजांना वचन दिले. श्रीमहाराजांनी तिच्या ओंजळीत पाणी घातले आणि, "आजपर्यंत मी जी पापे केली ती सर्व आपल्याला

अर्पण करते" असे म्हणावयास सांगून ते उदक आपल्या हातावर घेतले त्याबरोबर मन स्वच्छ झाले, पण श्रीमहाराजांचे सर्व शरीर करपल्यासारखे दिसू लागले. असे का झाले असे त्यांना विचारता ते म्हणाले, "पाप ही आगच असते. त्यातून राजे लोकांचे पाप ही मोठीच आग असणार! असो मला त्रास झाला खरा, पण त्या बाईचे कल्याण झाले." आठ दिवसानी रंग निवळून त्यांचे शरीर पहिल्यासारखे झाले.

**दादासाहेब, मी वकिलाप्रमाणे वागतो:**

औंधचा प्रशासक जेकब यानें खोटाच आरोप ठेवून महाराजांवर फिर्याद दाखल केली. श्रीमहाराजांनी दादासाहेब करंदीकर यांना वकील नेमले. कोर्टांत केस चालून महाराज निर्दोषी ठरले. निकाल सांगण्यासाठी दादासाहेब महाराजांकडे आले, व पाहातात तो ते अगदी निर्विकारी असून स्वात्मानंदात मग्न होते. दादासाहेब बोलले, "महाराज, आपल्या बाहेरच्या वागण्यावरून आपल्या मनात काय चालले आहे हे समजणे कठीण आहे!" श्रीमहाराजांनी हसून उत्तर दिले, "दादा अरे मी सुद्धा वकिलाप्रमाणेच वागतो. तो जसा आपल्या अशिलाची केस जिंकली काय किंवा हरली काय याचे मनाला लावून घेत नाही. पण कोर्टात मात्र अटीतटीने भांडतो, तसा मीही व्यवहारी जगात व्यवहारानेच वागतो. पण व्यवहारातही भगवंताचे अनुसंधान जर अचूक ठेवले तर व्यवहार एक खेळ होतो. मात्र तो प्रत्यक्ष खेळताना जिकण्याचाच आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. भगवंताचे नाम घेतले कीं हे साधते. नामाने चित्त आरामात असते."

**विषप्रयोग**

यानंतर जेकबने महाराजांवर विषप्रयोग करण्यासाठी लारोपाठ तीन माणसे पाठविली. पण प्रत्येकजण महाराजांपुढे येतांच आपले अंतःकरण उघडे करी, त्यांची क्षमा मागे आणि अनुग्रह घेऊन जाई. चौथ्याने महाराजांनाच आपल्याकडे जेवायला बोलावले व अन्नात सोमल मिसळून ते महाराजांना वाढले. श्रीमहाराज जेऊन जे मंदिराध्ये आले तोच त्यांच्या पोटात भयंकर आग उठली व तोंडाला शोष पडून ते हा हा करून सारखे पाणी मागू लागले. सायंसमयाला हवेत गारवा आला. तेव्हा कुठे श्रीमहाराजांच्या पोटातील आग पुष्कळ शमली व त्यांना शांत वाटू लागले. रात्री ते कीर्तनाला उभें राहिले व निरूपणाला स्वतःचाच अभंग सुरू केला :

**काय पाहता श्रेष्ठजन। काळ आला हो कठिण ॥१॥**
**नका भुलू भलत्या भ्रमीं। नाम जपा अंतर्यामीं ॥२॥**
**नाम सांगता जनासी। विष देऊं येती त्यासी ॥३॥**
**दास म्हणे काळगती। पहा युगाची प्रचीती ॥४॥**

शेवटचे कडवे ऐकल्याबरोबर दुपारच्या श्रीमहाराजांच्या दशेचे कारण सर्वांच्या लक्षात आले. साठीच्या पुढे झालेल्या या विषप्रयोगामुळेच महाराजांची प्रकृती यानंतर झपाट्याने ढासळत गेली !

**माझ्या नशिबी काळजी नाही :**

एकदा श्रीमहाराज मंडळीशी सुखसंवाद करीत होते. काळजीचा विषय निघाल्यावरून ते म्हणाले, "येथे येणारी प्रत्येक मंडळी आहेत, पण प्रत्येकजण आपला काळजी करीत असतो. काळजी करायला कारण तरी काय असते ?" सहा जणांने वेगवेगळी कारणे साधार सांगितली. नंतर श्रीमहाराज म्हणाले, "तुम्ही सांगितल्यापैकी माझ्यापाशी कोणती कारणे आहेत ते पाहू. माझ्याजवळ एकही पैसा नाही, माझी बायको असून नसून सारखीच आहे. मला मुलगा किंवा मुलगी नाही. येथील मंडळी आज ना उद्या आपापल्या घरी जाणार आणि माझा कोणीहि नातलग तर इथे नाही, तेव्हा माझे पदोपदी अडणार. शिवाय इथे माझी इच्छा बाजूला ठेवून मला लोकांच्या इच्छेनेच वागावे लागते. सारांश तुमच्या काळजीची बहुतेक कारणे माझ्यात एकवटली आहेत, तरीसुद्धा मला काळजी अशी नाहीच. तेव्हा काळजी लागण्यासाठी करावे तरी काय ?" काका फडके म्हणाले, "मी सांगतो, महाराज. अब्रू जाण्याचा प्रसंग आला तर मनुष्याला काळजी लागलीच पाहिजे." श्रीमहाराज म्हणाले पहा, आधी मला फारशी अब्रू नाहीच. पण जी काय थोडी असेल तीही जाणण्याकरिता मी काय करू म्हणजे मला काळजी चिकटेल ?" काका म्हणाले, "महाराज, आपण शंभर मेहुणे उद्या प्रसादाला बोलवावी. आज कोठी पूर्ण रिकामी आहे आणि जवळ एक पैसाही नाही. तेव्हा अशा बिकट परिस्थितीत उद्या आपल्या मनाची काय अवस्था होईल बरे !" श्रीमहाराजांना काळजी चिकटण्याचा एकदम हर्ष झाला व ते म्हणाले, "बस्स, ठरले ! मी शंभर मेहुण्यांच्या भोजनांचा संकल्प आत्ताच सोडतो. काका, याच पावली तुम्ही आमंत्रणे करून या." काकांनी त्याप्रमाणे आमंत्रणे केली. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता श्रीमहाराज कीर्तनाला उभे राहिले व आम्ही काय कुणाचे खातो रे । तो राम आम्हाला देतो रे ॥' या श्रीसमर्थांच्या पदावर निरूपण सुरू केले. दोन तासपर्यंत श्रोते आनंदात डुंबले होते. आरती झाली तेव्हा एक वाजण्याचा सुमार होता. मग जेवणासाठी श्रीमहाराजांना कुजबूज ऐकू येऊ लागली. इतक्यात मंदिरासमोर एक भरलेली बैलगाडी थांबली. गाडीच्या मालकाने आत येऊन श्रीमहाराजांना साष्टांग नमस्कार घातला व म्हटले, "महाराज, मी असा नवस बोललो होतो की, मला जर मुलगा झाला तर श्रीरामरायाला नैवेद्य करून दोनशे मंडळींना भोजन घालीन. काल रात्री जेव्हा माझ्या बायकोने नवसाची आठवण दिली तेव्हा आज सकाळपासून सामानाची जय्यत तयारी करून इथे आणली आहे. फक्त शिजवून रामाला नैवेद्य करण्याची कृपा व्हावी." 'जानकीजीवनस्मरण जय जय राम' म्हणत श्रीमहाराज उठले. त्यांनी रामाला साष्टांग नमस्कार घातला, गाडीतले सामान काढून चूलीमध्ये अग्नि पेटवला व स्वैपाक होऊन रामाला पुरणाचा चारी ठाव नैवेद्य झाला. संध्याकाळी पाचपर्यंत सगळ्यांची जेवणे आटोपली. त्या गृहस्थाला निरोप दिल्यावर श्रीमहाराजांनी मंडळींना बोलवून म्हटले, "पाहिलेत ना ! भक्तांचा योगक्षेम नित्य भगवंत चालवितो.

पण त्याचे अनन्य चिंतन करून त्याला सतीची भक्ति अर्पण केली तर ! काका, बघा. माझ्या नशिबातच काळजी नाही तर तिच्या नादी आपण लागा कशाला ?"

**गोंदवल्याची विप्रसभा**

श्रीमहाराज रामनामाचे महत्त्व पटवून ते घेण्याची आर्जवे करीत असत. परंतु वैदिक कर्ममार्गाचा किंवा अन्य उपासनांचा ते कधीही धिक्कार किंवा निंदा करीत नव्हते. ते स्वत: दोन्ही वेळ संध्या करीत व इतराना करण्यास सांगत. गोंदवल्यास त्यांनी दोन गायत्री पुरश्चरणे घडवून आणली. दुसऱ्या पुरश्चरणाला त्यांनी कर्नाटक व महाराष्ट्र येथून वैदिक ब्राह्मण बोलाविले होते. याही वेळेस ते विप्रांना रामनाम घेण्यास विनवीत होतेच. पण हे त्यांना मुळीच न मानवल्यामुळे एकाने संधी साधून श्रीमहाराजांना स्पष्ट सांगितले, "महाराज, आपण वेदाज्ञेप्रमाणे द्विजांना गायत्रीऐवजी रामनाम उपासना सांगता हे वेदबाह्य आहे." श्रीमहाराज म्हणाले 'आपण स्पष्टपणे आपले मत सांगितले हे खरोखर कौतुकास्पद आहे. तरी पण याचा निर्णय आपण सभेत लावू." मग श्रीराममंदिरात विप्र-सभा भरली. विप्रांना उद्देशून ते म्हणाले, "गायत्री मंत्र अखिल वेदांचे बीजरूप शब्द-ब्रह्म आहे व त्याचा अधिकारी देवांनाही पूज्य आहे हे खरे; परंतु कोणताही वेदमंत्र घेतला तरी त्याचा उपासक प्रखर वैराग्य व पवित्र आचरणाचा जर नसेल तर तो मंत्र सिद्धिदायक होत नाही. यासाठीच ऋषींनी आपले वास्तव्य जनपदापासून स्वतंत्र व दूर ठेवले होते आणि सर्व ईषणापासून ते अलिप्त होते. आपण त्यांचेच वंशज खरे, पण आपल्यामध्ये त्यांच्यातील एकतरी गुण सापडतो का ? आपली मूळ जीवननिष्ठाच बदल-ल्यामुळे वैदिक कर्म आता एक व्यापार झाला आहे ! आणि म्हणून त्यावर कोणाची निष्ठाही राहिली नाही. तरी वैदिक उपासनांचे सध्याचे स्वरूप जसे कवायती थाटाचे आहे त्यावर चित्तशुद्धि व आत्मज्ञान प्राप्ति विसंबून न ठेवता त्याला भगवंताच्या नामाची जोड देणे अत्यंत आवश्यक आहे. आपण याचा आधार भागवताच्या एकादश स्कंधात बघावा. 'कृते यत् ध्यायसतो पूंसाम् । त्रेतायां यजतो मखैः ॥ द्वापारे परिचर्यायाम् । कलौ तत् हरिकीर्तनात् ॥' आपणाला वेदाचेच प्रमाण हवे असेल तर अथर्वण वेदातील कलि-संतरणोपनिषद् पहावे. प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने नारदाला, 'हरे राम हरे राम राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥' हा मंत्र कलियुगासाठी सांगितलेला आहे. म्हणून माझी आपणास कळकळीची विनंती आहे की, आपण नाम घेत जावे. मी आपणास ग्वाही देतो की या साधनानेच आपणास वेदाचे रहस्य समजेल." श्रीमहाराजांचे ते लीन व आर्जवी शब्द, नामावरचा आत्मविश्वास, साधे पण स्वानुभवाचे तेजस्वी निवेदन, विषयाच्या मांडणीची कुशलता आणि परंपरेचा आदर हे पाहून तेथल्या तेथे पुष्कळ विप्रांनी अनुग्रह घेतला.

## दहा कोट रुपये मागणारा गांजेकस ब्राम्हण

एका दरिद्री ब्राह्मणाला गांजाचे फार व्यसन होते. त्याच्यापायी त्याला उद्योगधंदा करण्याचेही त्राण राहिले नाही. त्याने विचार केला की साधु लोक फुकट पैसा मिळविणारे असतात. तर आपण त्यांनाच एकदम दहा कोटि रुपये मागावेत म्हणजे कायमची ददात मिटेल. प्रत्येकाला तो म्हणे, "तुम्ही तर लक्ष्मीपति वश केला आहे तेव्हा मला फक्त दहा कोटि रुपये द्या." सगळीकडे तो निराश झाला. तेव्हा शिरडीला साई बाबांकडे गेला. त्यांनी सांगितले "तू गोंदवल्याच्या महाराजांकडे जा. ते फार श्रीमंत आहेत. प्रत्यक्ष 'राजाराम' त्यांची सेवा करतो आहे." तेव्हा तो गोंदवल्यास आला. त्यांचे मागणे ऐकून श्रीमहाराज म्हणाले, "एवढेच ना! ते माझ्याकडे लागले. तुम्ही काही दिवस इथे रहा, तेवढ्यात मी तजवीज करतो. तुम्ही मुळीच काळजी करू नका." पुढे तो रोज श्रीमहाराजांचे दर्शन घेऊन आपल्या कामाविषयी विचारी व रोज श्रीमहाराज त्याला सांगत, 'तुम्ही जरा धीर धरा. मी त्या मार्गात आहेच." असा एक आठवडा गेला. शेवटी त्याने निर्धार केला की, आज जर रुपयांचे तोडे मिळाले नाहीत तर प्राणत्याग करायचा. असा निर्धार करून तो मंदिरात आला तो श्रीमहाराज आठवल्यासारखे करून म्हणाले. "अरे हो! मी तुम्हाला निरोप देण्याचे विसरलोच की! तुमच्या थैल्या रात्री तळघरात तयार ठेवल्या आहेत. आता फक्त शंभर एक बैलगाड्या तुम्ही आणा म्हणजे माझी माणसे या मोजून गाड्यात टाकतील आणि तुम्ही खुशाल घेऊन चला." तेव्हा त्याचे डोळे चक्क उघडून तो म्हणाला, "महाराज मी इतक्या गाड्या कोठून आणू?" श्रीमहाराज बोलले "मी तरी तुम्हाला कोठून देऊ? हे सुगीचे दिवस असल्याने मला एकही गाडी कोणी देऊ शकणार नाही." मग मात्र त्याच्या डोक्यातला कैफ पूर्ण उतरला. महाराजांनी त्याला अनुग्रह दिल्यावर त्याने प्रेमाने निरोप घेतला.

# "अनंतात अंत !"

—विजय द. हजारे

स्वार्थाचिया पोटी
उपजितो स्वार्थ
साधू परमार्थ
कैसा येथ.

आपपर भाव
तुझा माझा गांव
डळमळे नाव
संसारात.

जडलेले लोभ
सोडता न येती
मनातुनी जाती
कधीहि ना.

गुरफटे चित्त
पाहुनिया वित्त
माझा मीच मत्त
झालो येथें.

म्हणोनिया काहीं
सुचतसे नाही
भक्तीभाव तोही
नुरे येथ.

तरी अता देवा
ठाव पायी द्यावा
अनंतात अंत.

# मार्ग कोणता ?

लक्ष्मीतनया, महाड.

हविर्भाग तो यज्ञामधला,
मार्ग कोणता समर्पणाला ? ॥धृ॥
प्रेमामृत जणुं नेत्रिं पाझरा,
हास्यरसाचा करा फवारा,
अभीष्टचिंतन वृष्टि वरि करा,
ह्याच समीधा जगञ्चक्षुला ॥१॥
सकल हितार्थी, देह झिजावा,
हातांचा विनियोग करावा,
सुख समृद्धी हेतु असावा,
इंद्राकरिता यज्ञ वदावा ॥२॥
अहंमन्यता सुळी चढू द्या,
राष्ट्रात्मा बल वृद्धि कराया,
तत्त्वमसि हृदिं तत्त्व बाळगा,
वेदांताचा अर्थ खरा ह्या ॥३॥
ईश्वर नटला नररूपाने
पुढे चालणें संघ शक्तीनें
विश्वगीत गा, दृढभावाने,
यज्ञ भारतीं असा करावा ॥४॥
विषय-विकारी मनोभावना,
मोह, द्वेष ह्या स्वार्थ कल्पना
'हवनद्रव्य' हीं, योग्यचि माना,
यज्ञ-वेदितुन ज्ञान फुलूं द्या ॥५॥

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○

# "तू माता हम बालक तेरे"

राधाकृष्ण गुप्ता "चेतन"

निशिदिन तेरा ध्यान धरे हम
चरणों में माँ ! नमन करें हम ॥टेक॥
रक्तवर्ण तू देवीरूपा
शक्ति वैष्णवी ज्ञानस्वरूपा
महाभाव में रमण करें हम ॥१॥
ज्वाला माई जगत समाई
शिवशक्ति तू पार्वतीमाई
लीला तेरी श्रवण करें हम ॥२॥
अगाध लीला पार न पावे
ऋषिमुनि तेरी महिमा गावे
सदैव तेरा मनन करें हम ॥३॥
तू माता हम बालक तेरे
जन्म-मरण के अद्भुत फेरे
तेरी ही बस शरण पड़े हम ॥४॥
अज्ञानी हम तेरे याचक
आज सामने, माँ के बालक
दया प्रेम तव वरण करें हम ॥५॥
हाथ जोड़कर गान करें हम ।
चरणों में माँ! नमन करें हम ॥

# शिर्डीचे श्री साईबाबा

श्री साईबाबा झाले संत थोर
सदा हास्य विलसते मुखावर
भगवा कफनी असे अंगावर
असो माझा बाबाना नमस्कार ॥१॥

बसती ध्यानस्थ पाषाणावर
झाला तेथे त्यांना साक्षात्कार
असे तो दत्ताचा अवतार
असो माझा बाबाना नमस्कार ॥२॥

पुण्य क्षेत्र ते शिर्डी नगर
भरे तेथे बाबांचा दरबार
पटवूनी दिले महात्म्य अपार
असो माझा बाबाना नमस्कार ॥३॥

धूनी पेटवूनी ठेवीत समोर
दिसे दिव्यतेची ज्योत सुंदर
दाखविला करूनी उदिचा चमत्कार
असो माझा बाबाना नमस्कार ॥४॥

देऊनी शांती सुखाचे सार
केले निर्वाण कार्यपूर्ती नंतर
उभारले तेथे समाधी मंदिर
असो माझा बाबाना नमस्कार ॥५॥

जन पूजा बांधिती समाधीवर
उजळे दीपमाळेने ते मंदिर
तेज पडे आगळे सभोवार
असो माझा बाबाना नमस्कार ॥६॥

–श्री. रमाकांत पंडित

# शिरडीवृत्त–माहे एप्रिल १९७४

या महिन्यात श्रींचे दर्शनास बाहेरगावचे बरेच भक्त येऊन गेले. काही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे:–

**कीर्तन** १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.
२) श्री. तुकाराम बुवा परदेशी शिर्डी यांचे कीर्तन झाले.

**गायन** १) संगीत लोकनाट्य कै. तुकाराम खेडकर पार्टी. श्री. पांडुरंग मुळे, पुणे
**वादन** २) श्रीमती महेश्वरी रामचंद पुणे. ३) श्री. प्रसाद आर अय्यर पुणे.
**भजन** ४) श्री. यासीन, कोल्हापूर महाब्री पार्टी. ५) श्री. दिनेश साखरे. ६) श्री. दिनकरराव साळोखे.७) शाहीर प्रेम भोसले.८( श्री. नरेंद्र रेळेकर.९) श्री. गौस मियाँ खलीफा.१०) सौ. उषा पवार रेडीओस्टार. ११) श्री. कासम मुल्ला. १२) श्री. भालचंद्र कदम. १३) श्री. गणपतराव देवासकर मुंबई. १४) श्री. पांडुरंग दिक्षीत १५) सौ. विनोदीनी दिक्षीत मुंबई. १६) श्री. बी. व्ही. राज, रेड्डी. १७) सौ. जोत्ना बी. व्ही राजा रेड्डी मुंबई. १८) श्री नीतिन ईश्वरलाल मुंबई. १९) कु. वृंदा ईश्वरलाल मुंबई. २०) श्री. विठोबा तात्या पाटील लबडे नासिक. २१) श्रीमती लीला बाळकृष्ण शेलार, ठाणे. २२) श्रीमती सुमनबाई गणेश देव, मुंबई. २३) श्री. सदाशिव सुतार पुणे. २४) श्री. जी. मल्लेश पुणो २५) श्री.एकनाथराव चव्हाण पुणे. २६) श्री. हरीभाऊ जेजूरीकर. २७) श्री. नंदू लोंढे पुणे. २८) सौ. हिराबाई बेळगांवकर. २९) श्री. अरुण सरनाईक कोल्हापूर. ३०) श्री. विठ्ठलराव क्षिरसागर.३१) श्रीमती ज्योती मनोजा मुंबई ३२) श्रीमती विद्या माखिनी, मुंबई.

**सन्माननियांच्या भेटी:**– १) श्री. एस. एस. मोने, रिटायर्ड कलेक्टर.
२) श्री. ओ. पी. मेहरा, चिफ एअर मार्शल.
३) कॅप्टन श्री. सावंत, डिव्हीजीनल कंट्रोलर एस. टी. अ. नगर.
४) श्री. श्रीनिवास पाटील, प्रांत ऑफिसर संगमनेर
५) श्री. एम. जी. बालसुब्रह्मण्य्म, आय. ए. एस. ॲडिशिनल भारत सरकार डिपार्टमेट ऑफ बॅन्कीग न्यू, दिल्ली.
६) श्री. व्ही. के. शिंगुलू, आय. ए. एस. डेप्युटी सेक्रेटरी फायनान्स न्यू दिल्ली
७) श्री. एस. रामकृष्णन् आय. ए. एस. सेक्रेटरी रेव्हून्यू व फॉरेस्ट डिपार्टमेंट, महाराष्ट्र.
८) श्री. एम. एस. चौधरी, आय. ए. एस. ॲडिशिनल चिफ सेक्रेटरी गव्हमट ऑफ म. प्र. भोपाळ.

**हवापाणी** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# श्री साईलीला

येत्या जुलैचा अंक खास गुरुपौर्णिमा अंक म्हणून श्रीसाई भक्तांच्या भेटीस येत आहे.

* भगवान व्यासांवरील वाचनीय लेख
* गुरुपौर्णिमेसंबंधी विवेचनात्मक माहितीपूर्ण लेख
* गणेशपुरीचे ब्रह्मीभूत स्वामी नित्यानंद यांच्या पुण्यतिथी निमित्य खास सचित्र लेख
* 'कोणी काही म्हणा' हा श्रीसदगुरु साईनाथांच्यावरील सुंदर लेख
* साहित्यदर्शनमया नव्या ग्रंथपरिक्षणात्मक सदरात श्रीदास गणू महाराजांच्या ग्रंथावर अभ्यासपूर्ण परिक्षण
* श्रीसाई पुतळयांचे शिल्पकार श्री. हरीश तालीम यांची रंजक मुलाखत याशिवाय साईभक्तांची श्रद्धास्थाने, गाठीभेटी, मी साईभक्त कसा झालो, साईउदीचा प्रभाव, ही नित्याची सदरे

अनेक थोरामोठया, नामवंत साईभक्तांच्या कविता व पदे

पृष्ठे ४८ किंमत अवघी साठ पैसे.

Regd. No. MH/BYE/26


# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |
| ४½" × ५½" | रु. ०-३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिलेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिलेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | " " | १-२० |
| ३. शिलेवर बसलेले बाबा | " | २२.८६ × ३३-०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | " " | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा अल्बम ) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी., दादर, मुं. नं. १४



मुद्रक : **श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,** निर्णयसागर प्रेस,
४५-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई-१५.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई, १४.